cmyk

## संपादकीय

### वाचाळवीरांना वेळीच रोखा!

सध्या महाराष्ट्रात वाचाळवीरांचे अमाप पीक माजले आहे. ही पैदास वेळीच ठेचली गेली नाही तर राज्यात अराजक माजेल. आजकाल कोणीही सोम्यागोम्या उठतो आणि महापुरूषांबाबत अर्वाच्य बोलतो. आपल्या विधानामुळे काय रण माजेल याची त्याला तमा नसते किंबहुना रण माजावे अशीच त्याची इच्छा असते. मग ते राहुल सोलापूरकर असोत, प्रशांत कोरटकर असोत, राष्ट्रवादीचे जितेंद्र आव्हाड असोत, एमआयएमचे नेते ओवेसी असोत वा समाजवादी पक्षाचे नेते अबू आझमी असोत. या सा-या विषवल्ली आहेत. त्यांना वेळीच ठेचायला हवे.


दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### पाकिस्तानच्या सैन्याच्या ताफ्यावर हल्ला,९० सैनिकाचा मृत्यू

कराचीः रविवारी क्वेट्टाहून तफ्तानला जाणाऱ्या पाकिस्तानच्या ताफ्यावर हल्ला करण्यात आला, ज्यामध्ये किमान सात पाकिस्तानी सैनिक ठार झाले आणि २१ जण जखमी झाले. अधिकृत सूत्रांनी सात जणांच्या मृत्यूची पुष्टी केली, तर बलुच लिबरेशन आर्मी (बीएलए) ने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आणि ९० लष्करी जवानांचा मृत्यू झाल्याचा दावा केला. पाकिस्तानी अधिकाऱ्याने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, ‘‘क्वेट्टाहून तफ्तानला जाणाऱ्या सुरक्षा दलांच्या ताफ्यावर हल्ला करण्यात आला. सात बस आणि दोन वाहनांचा समावेश असलेल्या या ताफ्यावर हल्ला करण्यात आला. एका बसला आयईडीने भरलेल्या वाहनाने धडक दिली, कदाचित हा आत्मघातकी हल्ला असेल, तर दुसऱ्या बसला रॉकेट-प्रोपेल्ड ग्रेनेड्स (आरपीजी) ने लक्ष्य केले.


बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-३२२ | सोमवार, दि.१७ मार्च २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने- ६ | किंमत ३ रूपये


# शासनाच्या प्रकल्पासाठी शेतकऱ्यांच्या जमीनी पळविल्या

## केंद्राच्या अहवालात धक्कादायक माहिती, रस्ते, रेल्वे मार्ग, औद्योगिकीकरणामुळे शेतीक्षेत्रात घट

**मुंबई । प्रतिनिधी**

**कृषीप्रधान राज्य अशी ओळख असलेल्या महाराष्ट्राची कृषी क्षेत्रात झपाट्याने पिछेहाट होत असल्याचे चित्र आहे. गेल्या ५ वर्षांत महाराष्ट्राने ३.२५ लाख हेक्टर शेतीयोग्य जमीन गमावली आहे. देशभरात कमी झालेल्या एकूण शेतीयोग्य जमिनीपैकी निम्म्याहून अधिक जमीन एकट्या महाराष्ट्राची आहे. केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी लोकसभेत एका प्रश्नाला दिलेल्या लेखी उत्तरातून ही धक्कादायक बातमी समोर आली आहे.**



महाराष्ट्र कृषिप्रधान राज्य आहे. महाराष्ट्रात शेतीमध्ये विविध प्रयोय यशस्वीपणे राबवले जातात. उद्योगधंद्यांत अग्रेसर असलेले महाराष्ट्र राज्य, कृषिक्षेत्रातही वरच्या स्थानावर आहे. मात्र आता या वस्तुस्थितीला तडे जातात की काय असे चित्र निर्माण झाले आहे. लगतच्या काही वर्षांत राज्यातल्या शेतीक्षेत्रात मोठी घसरण झाल्याचे पाहायला मिळत आहे. महाराष्ट्राचे एकूण क्षेत्रफळ- ३.७ कोटी हेक्टर इतके आहे. शेती लागवडीखाली जमीन १.६५ कोटी हेक्टर इतकी आहे. १.६४ कोटी हेक्टर जमिनीवर यंदा लागवडी खाली आहे. पान २ वर

## २०२६ पर्यंत २ हजार आरोग्य केंद्रे सौरऊर्जा स्वावलंबी होणार-मुख्यमंत्री

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र सौरऊर्जा स्वावलंबी करण्याचे उद्दिष्ट राज्य सरकारने समोर ठेवले आहे. राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांना अपारंपरिक ऊर्जेच्या साहाय्याने सक्षम करण्याचा उद्देश आहे. यानुसार सेल्को फाउंडेशनच्या सहकार्याने १८ जिल्ह्यांतील केंद्रांचे सौरऊर्जीकरण करण्यात येत आहे. आतापर्यंत ८ जिल्ह्यांतील आरोग्य केंद्रे सौरऊर्जेवर चालू लागली असून उर्वरित १० जिल्ह्यांमध्येही हे प्रकल्प लवकरच कार्यान्वित होतील, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. या संदर्भातील माहिती त्यांनी एक्स सोशल मीडिया अकाऊंटवरून दिली आहे.**



मुख्यमंत्री यांनी पुढे सांगितले आहे की, या प्रकल्पाचे काम दोन टप्प्यात सुरू आहे. पहिल्या टप्प्यात २५० प्राथमिक आरोग्य केंद्रांचे सौरऊर्जीकरण पूर्ण झाले असून, जून २०२६ पर्यंत आणखी २ हजार केंद्रे सौरऊर्जेवर स्वावलंबी होतील. यामुळे २४ तास अखंड पान २ वर

# संतोष देशमुख खून प्रकरणाची आष्टीत पुनरावृती

## प्रेम प्रकरणातून हत्या: ट्रकचालक तरुणाला दोन दिवस डांबून ठेवत काटा काढला

**आष्टी । प्रतिनिधी**

**संतोष देशमुख खून प्रकरणाची आष्टी तालुक्यात पुनरावृती झाली असून ट्रक चालक असलेल्या २५ वर्षीय तरुणाला दोन दिवस डांबून ठेऊन मारण्यात आले. मारहाण ऐवढी करण्यात आली की त्यातच त्याचा मृत्यू झाला. प्रेम प्रकरणातून ही हत्या झाली असल्याचे समजते. या घटनेमुळे पुन्हा बीड जिल्हा हादरला आहे.**





आष्टी तालुक्यातील पिंपरी घुमरी येथील भाऊसाहेब क्षीरसागर यांच्या ट्रकवर जालना येथील विकास बनसोडे हा चालक म्हणून काम करीत होता. तो २०१८ पासून त्यांच्याकडे कामाला होता. होळीच्या आदल्या दिवशी तो जालना येथे घरी होता. मात्र होळीला मालकाने बोलावल्याचे सांगून तो आष्टीला आला. भाऊसाहेब क्षीरसागर यांच्या मुलीशी त्याचे प्रेम संबंध असल्याच्या संशयावरुन क्षीरसागर कुटुंबाने विकास बनसोडे व इतर एकाला पकडून घराजवळील पत्र्याच्या शेडमध्ये दोघांना बांधून टाकले. त्यानंतर दोन दिवस विकासला व त्याच्या साथीदाराला क्षीरसागर कुटुंबातील भाऊसाहेब क्षीरसागर, बाबासाहेब क्षीरसागर, सुशांत शिंदे, सचिन भवर, स्वाती क्षीरसागर, सुवर्णा क्षीरसागर, बापुराव शिंदे यांनी दोर आणि वायरच्या सहाय्याने विकासला बेदम मारहाण केली. यातच त्याचा मृत्यू झाला. त्याच्या शरीरावर मोजता येणार नाहीत ऐवढे वळ होते. विकास मयत झाल्याचे लक्षात येताच भाऊसाहेब क्षीरसागर यांनी विकास बनसोडे याच्या घरच्यांना फोन करुन बोलावून घेतले. तसेच मयत विकासला शासकीय रुग्णालयात आणून टाकले. विकास बनसोडे यांचे नातेवाईक पिंपरी घुमरी येथे आल्यावर त्यांना तेथे विकास दिसला नाही. शिवाय भाऊसाहेब क्षीरसागर यांचा फोनही बंद होता. बाबासाहेब क्षीरसागर यांना त्यांनी फोन केल्यावर पान २ वर

### “ आरोपी अन् मयत विकासच्या कुटुंबाची कॉल रेकॉर्डिंग व्हायरल

भाऊसाहेब क्षीरसागर यांनी जालना येथे विकासच्या आई-वडीलांना फोन करुन आष्टीला येण्याचे सांगितले. या वेळी विकासची आई, वडील आणि भाऊ यांच्याशी भाऊसाहेब क्षीरसागर यांचा संवाद झाला. ही कॉल रेकॉर्डिंग सोशल मिडीयावर व्हायरल झाली आहे.

### “ संतोष देशमुख यांच्यासारखेच तडफडून मारले-अंजली दमानिया

संतोष देशमुख यांना ज्या प्रकारे मारण्यात आले तसाच हा प्रकार दिसत आहे. विकास बनसोडे याच्या शरीरावर ऐवढे वळ आहेत की त्याच्या शरीरावर जागाच शिल्लक नाही. ही क्रुरता त्या लोकांमध्ये आली तरी कुठून ? असा प्रश्न अंजली दमानिया यांनी उपस्थित केला आहे.

## ...तर २४ तासात कोरटकरला होऊ शकते अटक!

### मुधोजी राजे भोसले मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रातून संतापले

**नागपूर । प्रतिनिधी**

**कोल्हापूरच्या गुन्ह्यात प्रशांत कोरटकर यास इतिहासकार इंद्रजीत सावंत धमकी, छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज यांचा अवमान प्रकरणी जामीन मिळाला असला तरी नागपूर तसेच जालना येथे दाखल झालेल्या गुन्ह्यात त्याला अटक का करण्यात आलेली नाही, असा प्रश्न नागपूरचे राजे मुधोजी भोसले यांनी उपस्थित केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मनात आणले तर २४ तासात कोरटकरला अटक होऊ शकते असेही त्यांनी म्हटले आहे.**



छत्रपती संभाजी महाराज यांच्या बलिदान दिवसाच्या निमित्ताने प्रशांत कोरटकरचा जामीन रद्द करावा, अशी मागणी भोसले यांनी केली. कोल्हापूर पोलिसांनी इतिहासकार इंद्रजीत सावंत, प्रशांत कोरटकर धमकी प्रकरणी हवा तसा तपास केला नाही. कोल्हापूरच्या गुन्ह्यात जामीन मिळाला असला तरी नागपूर आणि जालना येथे दाखल गुन्ह्यात अटक केली नाही असा आक्षेप घेत मुधोजी राजे भोसले यांनी एका पत्राद्वारे पोलिस अधीक्षक कोल्हापूर यांचे लक्ष वेधले आहे. दुसरीकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने ठोस कारवाई केली जाईल असे एकीकडे सांगितले. दुसरीकडे महापुरुषांचा अवमान करणाऱ्या प्रशांत कोरटकरला १७ मार्चपर्यंत अटकेपासून दिलासा मिळाला आहे. विशेष म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज यांचा अतिशय निंदनीय शब्दात अपमान करणाऱ्या कोरटकरला अटकेपासून संरक्षण देणारा अंतरिम जामीन ११ मार्च पर्यंत दिला गेला. तो दिवस छत्रपती संभाजी महाराज यांचा बलिदान दिवस, पान २ वर

# भोसले, ढाकणे कुटुंबाच्या सुरेश धस भेटीला

## ते घर ६० वर्ष जुने, कोणत्या नियमाने घर पाडले-आ.सुरेश धस



**शिरूर । प्रतिनिधी**

**कसलीही नोटीस न देता खोक्या भोसलेचे घर कसे पाडले. कोणत्या नियमाने ते घर पाडले ? असा प्रश्न आ. सुरेश धस यांनी उपस्थित केला आहे. खोक्या भोसलेच्या कुटुंबीयांची आ. सुरेश धस यांनी भेट घेतली. त्यानंतर त्यांनी ज्याला खोक्याला मारले त्या पिडीत ढाकणे कुटुंबाची सुध्दा भेट घेत कितीही पैसे लागले तरी चालेल पण अगोदर उपचार घ्या, असे आ. धस यांनी ढाकणे कुटुंबाला शब्द दिला.**

बीडच्या शिरूरमध्ये मारहाण प्रकरणी सतीश भोसले उर्फ खोक्या याला अटक झाली आहे. खोक्या सध्या तुरुंगात आहे. सतीश भोसले याला अटक केल्यानंतर १३ मार्च रोजी त्याचे व्हाईट हाऊस जमीनदोस्त करण्यात आले. खोक्याने बीडमध्ये वन विभागाच्या जमिनीवर बेकायदा घर बांधले होते. वन विभागाने धडक कारवाई करत हे पाडले आहे. खोक्या हा धस यांचा कार्यकर्ता आहे. त्या पार्श्वभूमीवर धस यांनी खोक्याच्या घरी भेट दिली. खोक्या अनेक वर्षांपासून वनविभागाच्या जागेवर अतिक्रमण करून वास्तव्यास होता. पान २ वर

### कुटुंबाने सांगितली आपबिती

आ. सुरेश धस हे आरोपी खोक्या भोसले याच्या कुटुंबाची भेट घेण्यासाठी त्याच्या घरी पोहोचले आहेत. शिरूर कासार गावात आम सभेसाठी आले असता त्यांनी खोक्या भोसले याच्या कुटुंबाची भेट घेतली आहे. यावेळी सतीश भोसले याच्या परिवाराने त्यांना आपबिती सांगितली. महिलांना अश्रु अनावर झाले होते.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१५ मार्च २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २७२.०० क्विंटल | २,५०० | २,८०० | २,६१० |
| ज्वारी/हायब्रिड: १८०.५० क्विंटल | १,७०० | ३,७५० | २,२६५ |
| मका/लोकल:२०.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : ३.५० क्विंटल | ६,००० | ६,००० | ६,००० |
| उडीद : ७.५० क्विंटल | ५,१०० | ५,१०० | ५,१०० |
| बाजरी: ९४.०० क्विंटल | २,००० | ३,०९० | २,५३४ |
| मुग :४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| सोयाबीन: ४३.५० क्विंटल | ३,६३० | ३,९८० | ३,८६२ |
| हरभरा: ५.५० क्विंटल | ४,९३० | ५,१०१ | ५,०१० |

## परिक्षेला गेलेल्या तरुणाचे मुंडके छाटले

### क्रुर हत्येने पुन्हा महाराष्ट्र हादरला; दगड बांधून विहिरीत मृतदेह टाकला

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

**माऊली याचा ७ मार्चला बारावीचा पेपर होता. तो पेपर देण्यासाठी त्याच्या दाणेवाडी येथील घरुन शिरूर येथे गेला होता. पेपर दिल्यानंतर परत तो घरीच आला नाही. तो बेपत्ता झाला होता. त्यानंतर गावाजवळ असणाऱ्या एका विहिरीत त्याचा मृतदेह सापडला होता. माऊली गव्हानेचे मुंडके छाटुन त्याचा मृतदेह दगड बांधून एका विहिरीत टाकला होता. प्रेम प्रकरणातून घडलेल्या या हत्येमुळे महाराष्ट्र हादरला आहे.**

राज्यात गुन्हेगारांना कायद्याची काहीच भीती उरली नाही. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची क्रूरपणे हत्या झाल्याच्या प्रकारानंतर राज्यभरात संतापाची पान २ वर

## चार दिवस तीव्र उष्णतेच्या लाटेचा इशारा

### अधिकाऱ्यांना सार्वजनीक सुरक्षितता सुनिश्चित करण्याची सूचना



**पुणे । पतिनिधी**

देशभरात झपाट्याने हवामानात बदल होत आहे. बहुतांश राज्यात कमाल तापमान रोज नवा उच्चांक गाठत आहे. दरम्यान, हवामान विभागाने पुढील ४ दिवस देशातील अनेक राज्यांत तीव्र उष्णतेच्या लाटेचा इशारा रविवारी (दि.१६) दिला आहे. देशातील अनेक प्रदेशांमध्ये पारा ४० अंश सेल्सिअस ओलांडत असल्याने, अधिकाऱ्यांनी सार्वजनिक सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी इशारे आणि सूचना जारी केल्या आहेत.

देशभरात तापमानात झपाट्याने वाढ होत आहे. झारखंड, पान २ वर

# महायुती सरकार म्हणजे ‘गँग्ज ऑफ वासेपूर’ सारखे टोळ्यांचे सरकार

## •हर्षवर्धन सपकाळ यांची टीका

**रत्नागिरी । प्रतिनिधी**

राज्यातील भाजपा युती सरकारने आश्वासन देऊनही शेतमालाला भाव दिला नाही, शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली नाही. लाडक्या बहिणीच्या मतांवर सत्तेत आले पण सत्तेत आल्यानंतर १० लाख बहिणींना लाभापासून वंचित ठेवले आहे. आश्वासन देऊन न पाळणे हे सरकारचे अपयश आहे. भाजपा युती सरकार मस्तीत चालले असून मंत्र्यांमध्ये बेबनाव आहेत, सत्तापिपासू वृत्तीची माणसे सत्तेत आहेत. गँग्ज ऑफ वासेपूर सारखे हे टोळयांचे सरकार



असून त्याची किंमत मात्र जनतेला चुकवावी लागत आहे, असा घणाघाती हल्लाबोल काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला.

रत्नागिरी येथे पत्रकार परिषदेत बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी भाजपा युती सरकारवर कडाडून हल्ला चढवताना म्हणाले की, राज्यात कायदा सुव्यवस्था अत्यंत बिघडलेली आहे. बीड जिल्ह्यात सरपंचाची अत्यंत क्रूरपणे हत्या करण्यात आली, त्यामागे कोण आका होता ते जनतेने पाहिले, आता आकानंतर खोक्या आला आहे. एक मंत्री पान २ वर

### भाजपाला शिवाजी महाराजांचा इतिहास व शौर्य पुसून टाकायचे आहे

हर्षवर्धन सपकाळ पुढे बोलताना म्हणाले की, औरंगजेब हा क्रूर शासक होता, त्याने स्वतःच्या वडिलांना जेलमध्ये टाकले, भावाचा खून केला, लहान भावाला वेडे ठरवले. या क्रूरकर्मा औरंगजेबाला मराठी माणसाने या मातीत गाढले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य आम्हाला प्रमाण आहे, पण भाजपाला शिवाजी महाराजांचा इतिहास व शौर्य पुसून टाकायचे आहे म्हणून एक प्रवृत्ती औरंगजेबाची कबर उखडून टाका असे सांगत आहे. औरंगजेबाची कबर ही शिवाजी महाराजांच्या शौर्याचे प्रतिक आहे, ते शौर्य पुसून टाकायचे षडयंत्र आहे. औरंगजेबाचे उदात्तिकरण कोणीच करू नये पण भाजपा स्पॉन्सरच त्याचे उदातिकरण करत आहेत असा उपरोधिक टोलाही यावेळी लगावला.

cmyk

## अग्रलेख

# महाराष्ट्र थांबू नयेच, पण पोकळ घोषणा नको

राज्याची लोकसंख्या १२ कोटींच्या घरात पोहोचली आहे. देशात सर्वाधिक कर हा महाराष्ट्रातून जातो. त्यामुळे मूलभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात याच राज्यातील जनतेच्या मापक अपेक्षा; मात्र सत्ता काबीज करण्यासाठी निवडणुकीत घोषणा, आश्वासने देण्यात राजकारणी धन्यता मानतात. राज्याची तिजोरी आर्थिक भार पेलवणार का, घोषणांची अंमलबजावणी करण्याइतका तिजोरीत पैसा आहे का, याचा विचार सत्तेत असलेल्या प्रत्येक पक्षाने करणे काळाची गरज बनली आहे. सत्ता येते सत्ता जाते, मात्र जनतेचा सेवक म्हणून लोकप्रतिनिधींनी जबाबदारी पार पाडताना राज्याची आर्थिक कोंडी तर होणार नाही, याचा विचार करणे ही तितकेच गरजेचे आहे.

विधानसभा निवडणुकीआधी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची घोषणा केली आणि निवडणुका जाहीर होण्याआधी योजनेची अंमलबजावणी करण्यासही सुरुवात केली. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेंतर्गत आतापर्यंत सात हप्ते पात्र महिलांच्या बँक खात्यात जमा झाले; मात्र विधानसभा निवडणुकीत १५०० रुपयांऐवजी २१०० रुपये देणार, असे आश्वासन महायुतीने राज्यातील लाडक्या बहिणींना दिले; मात्र राज्याची आर्थिक स्थिती खालावल्याने १५०० रुपये लाडक्या बहिणींना देणे महायुतीसाठी डोईजड होऊ लागले आहे. महायुती सरकारने निवडणुकीत योजनांची घोषणा केली; मात्र घोषणांची अंमलबजावणी करणे हाताबाहेर जात आहे. मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे अवघड होत असताना घोषणांची पुढील पाच वर्षे अंमलबजावणी होईल की नाही, याची शाश्वती दस्तुरखुद्द महायुतीलाच नाही. त्यात दिवसेंदिवस कर्जाचा वाढता बोजा म्हणजे राज्य आर्थिक संकटात आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची घोषणा झाली, त्याचवेळी अर्थतज्ज्ञांनी राज्य सरकारच्या तिजोरीवर भार पडणार असे संकेत दिले होते; मात्र खुर्चीच्या लालसेपोटी अर्थतज्ज्ञाच्या सूचक इशाऱ्याकडे दुर्लक्ष केले. असो, राजकारणात सगळे काही आलबेल असे बोलले जाते. सगळ्या गोष्टींचे सोंग आणता येते, मात्र पैशांचे सोंग आणणे अशक्य गोष्ट आहे. त्यामुळे भविष्यात राज्याची आर्थिक घडी बसवण्यासाठी राज्यकर्त्यांनी योजनांची घोषणा करण्याआधी राज्यातील तिजोरीची काय स्थिती आहे, याकडे पाहणे गरजेचे आहे. आर्थिक स्थिती सुधारते तोपर्यंत तरी काहीशा योजनांची घोषणा न केलेलीच बरी. जनतेच्या मूलभूत सुविधांवर खर्चाची पूर्तता केल्यास नक्कीच महाराष्ट्राला चालना मिळेल, यात दुमत नाही. त्यामुळे दूरदृष्टीने ठेवून राज्यकर्त्यांनी घोषणा केली, तर खर्चाचा ताळमेळ राखणे शक्य होईल, अन्यथा खुर्चीसाठी घोषणा करायची आणि घोषणांची अंमलबजावणी करताना हात आखडता घेणे याचा अर्थ राज्य आर्थिक संकटात झोकले जात आहे, असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

घरची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्यावर प्रत्येक कुटुंबप्रमुख नियोजनबद्ध घराची स्थिती हाताळतो. आर्थिक स्थितीत सुधारणा होईपर्यंत काटकसर हा पर्याय निवडतो. निवडणुकीत कुठलाच मतदारराजा घरबसल्या पैसे द्या, अशी मागणी करत नाही; मात्र खुर्चीसाठी काही पण असा राज्यकर्त्यांचे राजकारण सुरू आहे. त्यामुळे २० टक्के राजकारण, तर ८० टक्के समाजकारण याला राजकारण्यांकडून हरताळ फासला जात आहे. जनतेसाठी काय पण अशी ओरड करणाऱ्या राजकीय पक्षांनी राज्याच्या तिजोरीत खडखडाट झाला आहे का, याचा आढावा घेत पुढील घोषणा, निर्णय घ्यावेत अन्यथा महाराष्ट्राची आर्थिक कोंडी वाढेल आणि याला सर्वश्री राज्यकर्ते जबाबदार असतील.

परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात होतेय, ही चांगली बाब आहे. ९ महिन्यांत १ लाख ३९ हजार ४३४ कोटींची गुंतवणूक महाराष्ट्रात आणली, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले. 'महाराष्ट्र आता थांबणार नाही,' हे या सरकारचे घोषवाक्य आहे. महाराष्ट्र थांबायला नकोच आहे; मात्र तो थांबू नये यासाठी या सगळ्या समस्यांवर उपचारांचा उतारा असणे गरजेचे आहे.

## कुप्पा येथील रोहीदास काका जाधव यांचे वृद्धापकाळाने निधन

**वडवणी । प्रतिनिधी**

**वडवणी तालुक्यातील कुप्पा येथील रहीवाशी आसणारे रोहिदा शेटीबा जाधव वय८५ वर्षे यांचे शनिवार दि १५ मार्च रोजी राहात्या घरीवृद्धाप काळाने निधन झाले.त्यांच्यावर कुप्पा येथील स्मशान भुमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.ते कुप्पा ग्रामपंचायतचे मा सदस्य बाबुराव मामा जाधव यांचे चुलते, बबन जाधव त्रिंबक जाधव यांचे वडील पत्रकार शंकर जाधव यांचे आजोबा होते.**



सविस्तर वृत्त असे ग्रामीण भागातील जे पाटलांचे चिरेबंदी वाड्यांना दगडी चिऱ्यांच्या माध्यमातुन कसल्याही प्रकारचा सिमेंट चा वापर न करता चुण्याचा वापर करुन आपल्या हस्त कलांच्या माध्यमातुन चिरबंदी वाड्यांना सजवनारे जुने कारगीर म्हणुन तालुक्यात प्रसिद्ध आसणारे रोहीदास शेटीबा जाधव यांनी वयाच्या ८५ वर्षी अखेरचा श्वास घेतला.त्यांना संपुर्ण गावात काका या नावाने ओळखले जायचे काकांचा स्वभाव शांत संयमी मनमिळाऊ स्वाभावाचे व लहान थोरांशी सर्वांना गोड वानीने चांगले बोलत आसत त्यामुळे रोहीदास काका सर्वांना हवे हवे से वाटत. त्यांच्या पश्चात दोन मुल दोन मुली , जावई सुना नातवंड पतु आसा मोठा परीवार आहे.दै. राज्य लोकतंत्र परीवार सहभागी आहे.

# रमजान महिना, सायमा आणि पुण्य

**सध्या इस्लाम धर्मातील सर्वात पवित्र समजला जाणारा रमज़ान महिना सुरू आहे. या महिन्यात पुण्य कमविण्याची संधी सायमा च्या रूपात चालून आली आहे. तेव्हा लोकहो, सायमाला आर्थिक मदत करून पुण्य कमवा. सध्या सायमावर उपचार सुरू असून ती अडखळत का होईना वाकर च्या साह्याने एक-एक पाऊल पुढे टाकत आहे. तिला तिच्या पायावर उभी राहून धावू शकणारी करण्याकरिता उपचारासाठी आर्थिक मदतीची गरज आहे. तिच्यावर उपचारासाठी आर्थिक मदत देऊ इच्छिणाऱ्यांनी ८८८८४५५२८२ सय्यद शफाऊद्दीन असहाबूद्दीन यांच्या भ्रमणध्वनी क्रमांकावर मदत पाठवावी किंवा लेखासोबत दिलेल्या क्यू आर कोड वर सुद्धा मदत पाठविता येईल.**

बीड जिल्ह्यातील पाटोदा येथे जवळपास गेल्या तेरा वर्षांपासून शेतात शेतगडी म्हणून अहोरात्र कष्ट घेणारे मिर्झा हुसेन बेग हे सपत्नीक शेतात राब-राब राबतात. संपूर्ण कुटुंबाचा डोलारा बेग पती-पत्नीच्या खांद्यावर असल्याने शेतगडी म्हणून जे काही उत्पन्न मिळते त्यातूनच आपल्या पोटच्या गोळ्यांचे पालन



पोषण आणि शिक्षण करावे लागत आहे. अशा या शेतमजूर जोडीला असलेल्या मुला-मुलींपैकी शेतात आई-वडील काम करत असताना नऊ वर्षांपूर्वी मुलगी सायमा ही बैलगाडी च्या सावलीत बैलगाडीखाली झोपली होती. तेव्हा तिची लहान भावंडे बैलगाडीवर खेळत असताना अचानक बैलगाडी उलटी झाली. ती सायमाच्या पाठीवर पडल्याने तिचे पाय कमरेपासून निकामी झाले होते. हुसेन बेग यांची आर्थिक स्थिती बरी नसल्याने त्यांनी करता येईल तेवढे उपचार सायमावर करून घेतले. नंतर जवळ पैसे नसल्याने पुढील उपचार त्यांना करता आले नाही. यामुळे सायमा ही घरी नऊ वर्षापासून अंथरुणावर पडून होती. यामुळे एवढ्या मोठ्या कालावधीत तिच्या अंगावर अनेक जागी मोठ्या जखमा झाल्या होत्या. जखमा एवढ्या खोल झाल्या की तेथील मास जाऊन अंगावर अनेक ठिकाणी खड्डे पडले आहेत. एकीकडे बैलगाडीचा आघात पाठीवर झाल्याने पाय निकामी झाले तर दुसरीकडे जखमांनी शरीर पोखरले गेले. सायमाची ही अवस्था काही दिवसांपूर्वी पाटोदा शहरातील किसान मशिनरी स्टोअर्स चे मालक सय्यद शफाउद्दीन यांच्या कानावर आली. त्यांनी उशीर न लावता तात्काळ सायमाच्या घरी धाव घेऊन सर्व परिस्थितीची माहिती घेतली आणि तिला पुणे येथील संचेती हॉस्पिटलमध्ये उपचारार्थ भरती केले. तसेच प्रसिद्धी माध्यमातून सायमा वर उपचारासाठी आर्थिक मदतीची गरज असल्याची बातमी प्रकाशित झाल्यावर समाजातील काही दानशुरांनी आर्थिक मदत केल्याने सायमा वर उपचार सुरू झाले आहेत. काही दिवस संचेती हॉस्पिटलमध्ये उपचार घेतल्यानंतर सायमाच्या कमरेपासून खाली पायापर्यंत आवश्यक उपकरणे लावून डॉक्टरांनी तिला वाकरच्या सहाय्याने चालण्याइतपत बरे केले आहे. चार पावले टाकताना भलेही त्याला खूप त्रास होत आहे, ती अडखळत आहे परंतु नऊ वर्षापासून अंथरुणावर पडून असलेली सायमा नऊ वर्षानंतर स्वतःच्या पायावर उभी तरी राहू शकली आहे. आता तिला अजून चांगले चालता यावे, याकरिता शस्त्रक्रियेची गरज आहे. तसेच शरीरावर जागोजागी झालेल्या जखमांच्या जागी प्लास्टिक सर्जरीची शस्त्रक्रिया करणे ही आवश्यक असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे. या शस्त्रक्रियांसाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक मदतीची गरज आहे. सध्या इस्लाम धर्मातील पवित्र रमज़ान महिना सुरू आहे. या महिन्यात दानधर्म करणाऱ्यांना मोठे पुण्य देण्याचा अल्लाह चा वादा आहे. एवढेच नव्हे तर या महिन्यात गरजवंतांना जो एक रुपया देईल त्याच्या नावे अल्लाह सत्तर रुपये दिले म्हणून नोंद करतो असे पवित्र कुरआन मध्ये नोंद आहे. तेव्हा लोकहो अशा प्रकारे सत्तर पट पुण्य कमविण्याची संधी सोडू नका. आपल्याकडून काढण्यात येणारी जकात, सदका, फ़ितरे यापैकी काहीही सायमाच्या उपचारासाठी द्या. जेणेकरून एका गरीब कुटुंबातील हात मजूर असलेल्या हुसेन बेग यांची मुलगी सायमा ही आपल्या पायावर उभी राहू शकेल, धावू शकेल आणि जिवनात काहीतरी करू शकेल. यासाठी गरज आहे ती आपल्याकडून आर्थिक मदतीची. आर्थिक मदत देण्यासाठी ८८८८४५५२८२ सय्यद शफाऊद्दीन असहाबूद्दीन यांच्या भ्रमणध्वनी क्रमांकावर मदत पाठवा किंवा लेखासोबत दिलेल्या क्यू आर कोड वर सुद्धा मदत पाठवू शकता.

### सायमा साठी धडपडणारे त्रिकूट

जेव्हापासून सायमाबद्दल सय्यद शफाउद्दीन यांना माहित पडले तेव्हा त्यांनी समाजातील दानशूरांना आर्थिक मदत करण्याचे आवाहन केले होते. ही बाब माहित झाल्यावर सा. खरा लोकमित्र चे संपादक पठाण हमीद खान आणि पत्रकार जावेद शेख हेही सायमाला बरी करण्याकरिता शक्य होईल ते कार्य करण्यासाठी झपाटले आहेत. सायमाला वेळोवेळी संचेती हॉस्पिटलमध्ये नेणे, उपचार करून परत आणणे याकामी सय्यद शफाउद्दीन, हमीद खान आणि जावेद शेख हे त्रिकूट सायमा साठी प्रचंड धडपड करीत आहे.

## भोकरदन जाफराबाद रोडवरील अपघातातील दोघांचा उपचार सुरू असताना मृत्यू

**जालना । प्रतिनिधी**

**भोकरदन-जाफराबाद रोडवरील विरेगाव जवळ भीषण अपघात ज्यात दोन दुचाकीस्वारांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला .शंकर सुधाकर मोहिते (वय २५ वर्षे) आणि धर्मराज विठ्ठल चिंचोले (वय ३६ वर्षे), हे दोघे बुलढाणा जिल्ह्यातील पळसखेडा बट येथील रहिवासी होते.प्राप्त माहितीनुसार, भरधाव वेगाने येणारी महिंद्रा क्रमांक २० ७२७६ या चारचाकीने भोकरदनहून बुलढाणा मार्गावर विरुद्ध दिशेने येणाऱ्या स्प्लेंडर दुचाकी क्रमांक २८ ५१८२ ला जोरदार धडक दिली.**

या धडकेत दुचाकी पूर्णपणे चिरडली गेली आणि दुचाकीस्वार गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने भोकरदनच्या शासकीय ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले, जिल्हा वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर राजेंद्र पाटील यांच्या दुर्लक्षामुळे मात्र पुरेशी वैद्यकीय सुविधा मिळत नसल्याने त्यांना छत्रपती संभाजीनगर रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र, रात्री उशिरा उपचारादरम्यान दोघांचाही मृत्यू झाला. अशी माहिती आहे. अपघातानंतर रात्री उशिरापर्यंत पोलिसांकडून गुन्हा दाखल झाला नव्हता. चारचाकी वाहन सिल्लोड येथील असल्याची माहिती मिळाली आहे. वाहनातील प्रवासी काही डॉक्टर होते, जे सपकाळ जळगाव येथे जेवणाचा कार्यक्रम आटपून भोकरदनकडे जात होते. दुचाकीस्वार हे भोकरदनहून आपल्या गावाकडे जात होते. शनिवार रोजी दुपारी दोघांचे अंतिम संस्कार करण्यात आले. त्यांच्या मृत्युमुळे पळसखेडा बट गावात हळहळ व्यक्त होत आहे आणि त्यांच्या कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. सदरील अपघात प्रकरणी सकुल चौकशी करण्यात यावे अशी मागणी होत आहे.

## चिखली बँकेकडून सरस्वती मंदिरासह जाग्याचा लिलाव, कर्ज दिलं कसं?

**जालना । प्रतिनिधी**

**चिखली बँक कडून नियमाप्रमाणे कर्ज देण्यात आलेला आहे परंतु या प्रकरणी चिखली बँकेची कोणी फसवणूक करीत असल्यास त्याच्या विरुद्ध आरबीआय कायदा नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येईल असे बँक प्रशासनाकडून सांगण्यात आले आले तसेच बँकेचा पैसा म्हणजेच जनतेचा पैसा असतो याचा पण विचार कर्ज घेणाऱ्या व्यक्तीने करणे गरजेचे आहे. तसेच काही व्यक्ती कर्ज घेऊन सदरील जागा दान करतात असा पण प्रकार घडतात . कोणत्याही बँकेकडून घर, वाहन, मालमत्ता, सोनं, चांदी, दागिने, आदि वस्तूंचे लिलाव होत असतो. परंतु आपला विश्वास बसणार नाही असा प्रकार जालन्यातील सरस्वती मंदिर व जाग्याच्या लिलावा बदनापूर चिखली बँकेने केला असल्याचे समजते?. अशी माहिती पत्रकार परिषद मध्ये देण्यात आली. सदरील मंदिरात हिंदू लोकांकडून दररोज पूजा-पाठ, नैवेद्य-आरती होणाऱ्या मंदिराचा लिलाव! यावर कोणाचाच विश्वास बसत नाही परंतु हे सत्य घटना घडली आहे.**



जालना शहरातील सारस्वत समाजाने एकत्र येत सन १९९९ मध्ये जालना शहरापासून जवळ असलेली खरपुडी रस्त्यावर (सर्वे नंबर २४८-अ मधील ०.७७ आर) सरस्वती मंदिराचे भूमिपूजन १८ जुलै १९९९ रोजी झालेले आहे. यावेळी रामेश्वर शर्मा, ओमप्रकाश ओझा, नंदलाल शर्मा, आदींची उपस्थिती होती. तर होतीच. सदरील मंदिर अवघ्या दोन वर्षातच हे मंदिर पूर्ण झाले आणि दिनांक २६ ऑक्टोबर २०२१ रोजी श्री सरस्वतीची जालना शहरातून मिरवणूक काढून याच सरस्वती मंदिरात प्राणप्रतिष्ठा देखील केली. आजही हे मंदिर सुस्थितीत आहे. रोज इथे पूजा-पाठ, नैवेद्य- आरती नित्यनियमाने. होते मंदिर परिसरही स्वच्छ आणि सुंदर आहे. भाविकही इथे रोज हजेरी लावतात असे असतानाही विश्वस्तांच्या दुर्लक्षामुळे हे मंदिर चिखली को-ऑपरेटिव बँक लिमिटेड चिखली, शाखा बदनापूर ने पाच कोटी रुपयांच्या वसुलीसाठी लिलावात काढले आहे. राकेश दुर्गाप्रसाद शर्मा यांनी या बँकेकडून कर्ज घेतले होते आणि या कर्जासाठी जामीनदार म्हणून अनुजकुमार श्रीनिवास सारस्वत, डॉ. श्रीनिवास बन्सीलाल सारस्वत, कैलास राधाकृष्ण क्षीरसागर, रमेश काशिनाथ वाघमारे, सुनील एकनाथ झोरे, सुनील रामराव काकडे हे होते. परंतु या रकमेची परतफेड न झाल्यामुळे आता सुमारे पाच कोटींच्या वसुलीसाठी या मंदिराचा लीलाव होत आहे. या मंदिराची न्यास नोंदणी कार्यालयाकडे विश्वस्त म्हणून नोंदणी देखील आहे. परंतु मागील वीस वर्षांमध्ये कुठलीच बैठक किंवा निवडणूक ही झाली नाही. त्यामुळे विश्वस्त मंडळाला अंधारात ठेवून बँकेकडे या मंदिराची जागा गहाण ठेवून हा सर्व प्रकार घडल्याचा आरोप सरस्वती मंदिर बचाव संघर्ष समितीने केला आहे. हा बचाव करत असताना एकीकडे कोणी कागदपत्रे दिली हे माहित नाही. अशी भूमिका संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांनी घेतली आहे. परंतु प्रत्यक्षात मात्र सध्या या विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष म्हणून डॉ. श्रीनिवास सारस्वत हे काम पाहतात असे सांगायलाही ही संघर्ष समिती विसरली नाही. विशेष बाब म्हणजे गेल्या वीस वर्षांपासून सुस्थितीत असलेल्या मंदिराची जागा चिखली को-ऑपरेटिव बँकेने गहाण ठेवून घेतलीच कशी? कारण तिथे आजही मंदिर उभे आहे, या मंदिराचे विश्वस्त आहेत, आणि कोणत्याही कागदपत्रांची खातरजमा न करता, स्थळ पाहणी न करता चिखली बँकेने हा सर्व प्रकार केला कसा? असा प्रश्न सरस्वती मंदिर बचाव संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे. आज या पत्रकार परिषदेला या विश्वस्त मंडळाचे माजी अध्यक्ष मुरारीलाल सारस्वत, माजी आमदार शकुंतला शर्मा, जितेंद्र ओझा, मनोज शर्मा, मधुसूदन ओझा, शैलेश शर्मा, परीक्षित शर्मा, राम सारस्वत, आदींची उपस्थिती होती.

## पान १ वरून...

### शासनाच्या प्रकल्पासाठी

पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी शक्तिपीठ महामार्गाविरोधात रस्त्यावर उतरले असतानाच शेतीचे क्षेत्र घटत असल्याची समोर आलेली माहिती चिंताजनक आहे. रस्ते, रेल्वे मार्ग, औद्योगिकीकरणामुळे शेतीक्षेत्रात घट होत असल्याचे दिसत आहे. वाढते शहरीकरण, राष्ट्रीय, राज्य महामार्ग, रेल्वे मार्गांसाठी भूसंपादन, औद्योगिकीकरणासाठी शेतीयोग्य जमिनीचा वापर अशी कृषी क्षेत्र घटण्याची अनेक कारणे आहेत. दरम्यान पायाभूत प्रकल्पांसाठी जमिनी लागणारच आहेत, त्यामुळे शेतीची जमीन कमी होणार असल्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी म्हटले आहे. राज्यात कमी झालेल्या शेतीवरून शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी सरकारसाठी धोक्याचा इशारा दिला आहे. तसेच देशात एक दिवस अन्नधान्याचा गंभीर प्रश्न उभा राहील, असेही त्यांनी म्हटले आहे.

**प्रकल्पांसाठी शेतीयोग्य जमीन देणे टाळायला हवे**

देशात झालेल्या हरितक्रांतीमध्ये महाराष्ट्राचा मोठा वाटा होता. त्याच राज्यातील शेती आता अडचणीत असल्याचे स्पष्ट होऊ लागले आहे. पायाभूत प्रकल्पांसह औद्योगिकीकरण विकासासाठी महत्त्वाचे असले तरी त्यासाठी शेतीयोग्य जमीन वापरणे धोकादायकच आहे. सरकारने प्रकल्पांसाठी शेतीयोग्य जमीन देणे टाळायला हवे. अन्यथा येणाऱ्या पिढीला पश्चाताप करण्याशिवाय दुसरा मार्ग उरणार नाही.

--------------

### २०२६ पर्यंत २ हजार आरोग्य केंद्रे

वीजपुरवठा मिळेल, विजेच्या खर्चात बचत होईल आणि आरोग्य सुविधा अधिक सक्षम होतील. तसेच पर्यावरणीय जागरूकता वाढेल, कार्बन उत्सर्जन कमी होईल आणि प्रदूषणावर नियंत्रण मिळवता येईल. या प्रकल्पासाठी आयकिया कंपनी आणि सेल्को फाउंडेशन मिळून ५० कोटींची मदत राज्य शासनाला देणार आहेत. याशिवाय आरोग्य कर्मचाऱ्यांना सौरऊर्जा प्रणालीच्या देखभालीचे विशेष प्रशिक्षणही देण्यात येणार आहे, असे देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे.

-------------

### संतोष देशमुख खून

त्यांनी विकासला शासकीय रुग्णालयात दाखल केल्याचे सांगितले. पुढे त्यांनीही फोन बंद केल्याने आपल्या मुलासोबत काही तरी वेगळे घडल्याचे लक्षात येताच बनसोडे कुटुंबाने अंभोरा पोलिस ठाणे गाठून तक्रार दिली. त्यानंतर विकासचा मृतदेह शासकीय रुग्णालयात आढळून आला. विकासच्या हत्येप्रकरणी भाऊसाहेब क्षीरसागर यांच्यासह ७ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**तीन ताब्यात, नऊ जणा विरुद्ध गुन्हा दाखल**

मुख्य आरोपी भाऊसाहेब भानुदास क्षिरसागर याच्यासह दोन महिलांना आष्टी पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. याप्रकरणी मयताचा भाऊ आकाश बनसोडे याच्या फिर्यादीवरून आष्टी पोलिस ठाण्यात भाऊसाहेब भानुदास क्षिरसागर, बाबासाहेब भानुदास क्षिरसागर, स्वाती भानुदास क्षिरसागर, सुवर्णा बाबासाहेब क्षीरसागर, संकेत भाऊसाहेब क्षिरसागर, सर्व रा.पिंपरी घुमरी ता.आष्टी,संभाजी झांबरे,सचिन भवर,भाऊसाहेब क्षीरसागर, सुशांत शिंदे,बापुराव शिंदे पुर्ण नाव गाव माहीत नाही याच्यावर खूनासह,अनुसूचित जाती,जमाती कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेने पुन्हा बीड जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.पुढील तपास आष्टीचे उपअधीक्षक बाळकृष्ण हनपुडे करीत आहेत.

--------------

### भोसले, ढाकणे कुटुंबाच्या

वनविभागाच्या जागेवर त्याने एक ग्लास हाऊस उभारल होते. खोक्या भाई रहात असलेल्या परिसरात वनविभागाने कारवाई करत अतिक्रमण उठवले. मात्र, खोक्याच्या ग्लास हाऊसवर अद्यापही कारवाई करण्यात आलेली नव्हती. कुणाचे घर पाडणं ही चांगली गोष्ट नाही. ती कारवाई का करण्यात आली याबाबत बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांकडून माहिती घेणार असल्याचे भाजप आमदारस सुरेश धस यांनी सांगितले. वनविभागाने ही घर पाडली कोणत्या नियमाने केले त्याची उत्तरे मिळणे गरजेचे आहे असे म्हणत सुरेश धस यांनी सतीश उर्फ खोक्याचे समर्थन केले आहे. तसेच त्याचे घर ६० वर्षापुर्वीचे असून ते कोणत्या नियमात बसते हे पाहणार असल्याचेही ते म्हणाले. तसे त्याला जेवढ दाखवण्यात येत आहे, तो तेवढा नसल्याचे यावेळी धस म्हणाले. शिवाय धस यांनी ढाकणे कुटुंबाची सुध्दा भेट घेतली. यावेळी त्यांनी उपचारासाठी मदत करणार असल्याचे आश्वासन दिले.

-------------------

### ...तर २४ तासात कोरटकरला

स्मृती दिवस खरेतर राज्यातील अठरापगड जनतेच्या, शिवभक्तांच्या भावना लक्षात घेता त्याचा जामीन रद्द व्हावा अशी अपेक्षा, मागणी आम्ही केली असताना त्याला १७ मार्चपर्यंत दिलासा दिला गेला. १७ मार्च तिथीप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज यांची तर १८ मार्च शहाजी महाराज यांची जयंती आहे. याचाच अर्थ हा सर्व प्रकार केवळ योगायोग नसून सरकारने जनभावनेचा अंत बघू नये, जनभावना संतप्त असल्याने त्याचा स्फोट होऊ शकतो, असा इशारा नागरिक कृती समितीच्या वतीने राजे मुधोजी भोसले यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लिहिलेल्या पत्रातून दिला आहे.

------------

### चार दिवस तीव्र उष्णतेच्या

कर्नाटक, पश्चिम बंगाल, ओडिशा आणि महाराष्ट्रात तीव्र उष्णतेच्या लाटेचा इशारा हवामान विभागाने रविवारी प्रसिद्ध केलेल्या हवामान बुलेटिनमध्ये दिला आहे. ओडिशाच्या अनेक ठिकाणी उष्णतेची लाट ते तीव्र उष्णतेची लाट, झारखंडमध्ये अनेक ठिकाणी, विदर्भात काही ठिकाणी आणि छत्तीसगडमध्ये देखील काही ठिकाणी पुढील ४ दिवसात उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे.

**या भागात मुसळधार पाऊस आणि बर्फवृष्टी**

ईशान्य भारतात वादळी आणि अरुणाचल प्रदेशात काही ठिकाणी मुसळधार पाऊस किंवा बर्फवृष्टी होण्याची शक्यता आहे. २० ते २३ मार्च दरम्यान पूर्व मध्य भारतात बऱ्यापैकी पाऊस पडण्याची शक्यताही हवामान विभागाने वर्तवली आहे.

------------

### प्रेम प्रकरणातून तरुणाचे

लाट उसळली आहे. आता पुन्हा एका १९ वर्षीय कॉलेज तरुणाचा निर्घृण खून झाला आहे. माऊली सतीश गव्हाने असे त्या युवकाचे नाव आहे. माऊली सतीश गव्हाणे हा बारावीचा विद्यार्थी आहे. त्या युवकाचे दोन्ही हात, पाय अन् मुंडके छाटले आहे. त्यानंतर धड एका पोत्यात तर पाय, हात, डोके एका पोत्यात भरुन दोन्ही गाठोडे विहिरीत फेकून दिल्याचा खळबळजनक प्रकार श्रीगोंदा तालुक्याचे सीमेवर असणाऱ्या दाणेवाडी गावामध्ये घडला आहे. पोलिसांना हे मृतदेह मिळाल्यानंतर माऊलीच्या नातेवाईकांना बोलवण्यात आले. त्यांनी तो माऊलीच असल्याचे सांगितले. सदरील हत्या ही प्रेमप्रकरणातून झाल्याचे म्हटले जात आहे.

०-----------

### महायुती सरकार म्हणजे 'गँग्ज ऑफ

फ.खोटी कागदपत्रे दिल्याप्रकरणी दोषी ठरला आहे तर सिंधुदुर्गचे पालकमंत्री रोज बेताल वक्तव्य करून राज्यातील शांतता व सौहार्दाला छेद देत आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल चुकीची माहिती पसरवली जात आहे. रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातही कायदा सुव्यवस्था बिघडली आहे, कोकण व मुंबईचा घनिष्ठ संबंध आहे. कोकणातील मराठी बाणा बिघडवण्याचा भाजपाचा प्रयत्न आहे. कोकणात विपुल प्रमाणात खनिज सापडले आहेत ते उद्योगपतींना द्यायचे आहे आणि याप्रकरणी कोकणातील माणूस आडवा येऊ नये म्हणून जाती धर्मात तेढ वाढवण्याचा प्रयत्न केला जात आहे. सत्ताधारी फक्त उद्योगपतींच्या हितासाठी कोकण उद्ध्वस्थ करू पहात आहे. शक्तीपीठ सुद्धा उद्योगपतींच्या फायद्यासाठीच केला जात आहे. बहुजन समाजातीला लोकांना गोव्याला तीर्थ पिण्यास पाठवायचे आणि उद्योगपतींना आयात निर्यात मोठ्या प्रमाणात करता यावी यासाठी हा शक्तीपीठाचा घाट घातला जात असल्याचा आरोप केला. पुढे बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, भाजपा ज्या कुशीत जन्मला त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला विरोध केला आहे. संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, सावित्रीबाई फुले यांना छळणारा विचारही तोच आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर याच विचाराने २०० वर्ष महाराजांची समाधी जनतेला कळू दिली नाही. महात्मा जोतीबा फुलेंनी महाराजांची समाधी शोधून काढली. महाराजांचा विचार व कार्य लोकांना कळू नये हा त्यामागचा डाव होता. भाजपा संविधान मानत नाही ते सरसंघचालक गोलवकर यांचे 'बंच ऑफ थॉट्स' मानते, याच पुस्तकात छत्रपती संभाजी महाराजांबद्दल काय लिहिले आहे, ते शिवेंद्रराजेंनी वाचावे. सावरकरांनी छत्रपती संभाजी महाराजांबद्दल काय लिहिले ते वाचावे. भाजपाच्या पिल्लावळी छत्रपती शिवाजीराजे व संभाजीराजे यांचा सातत्याने अपमान करत आहेत. अपमान करा व संरक्षण मिळवा, अपमान करा व पुरस्कार मिळवा हे काम भाजपा करत आहे. शिवाजी महाराजांचा अपमान करणाऱ्या सोलापूरकर व कोरटकरला संरक्षण दिले जाते, त्या सरकारमध्ये शिवेंद्रराजे भोसले आहेत, आपण हा अपमान का सहन करता? असा सवाल करत महाराजांचा अपमान करणाऱ्या सरकारमधून राजीनामा द्यावा असे आवाहनही यावेळी केले. या पत्रकार परिषदेला ज्येष्ठ नेते व माजी खासदार हुसेन दलवाई, आमदार भाई जगताप, प्रदेश उपाध्यक्ष ॲड. गणेश पाटील, प्रदेश सरचिटणीस रमेश कीर उपस्थित होते.

------------

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

सोमवार, दि. १७ मार्च २०२५



## घनकचऱ्याच्या होळीप्रमाणे मानवी मनातील द्वेष, मत्सर व भेदाभेद या भावनेची होळी होणे अत्यंत गरजेचे –तात्यासाहेब डोईफोडे

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील डोईफोडवाडी येथील माजी सरपंच व श्याम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात पवित्र असं ज्ञानदानाचे कार्य करणारे डोईफोडे सर यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे म्हटले आहे की आपण आपल्या हिंदू संस्कृतीनुसार होळीचा सण मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरा केलेला आहे त्यामध्ये आपण पर्यावरणातील घनकचरा, पर्यावरणास प्रतिकूल असणाऱ्या वस्तू व प्लॅस्टिक याची देखील आपण होळी केलेली आहे सणसमारंभ हे संस्कृतीचे जतन करण्यासाठी केले जातात सण समारंभाच्या माध्यमातून सामाजिक एकोपा वाढीस लागतो पण आज हल्ली समाज दुभंगू लागला आहे, सामाजिक सलोखा कमी होऊ लागलेला आहे एकमेकाचे संबंध तुटू लागलेले आहे समाजात जातिभेद वाढलेला दिसतोय एखादा माणूस आपल्यापुढे जात असेल तर त्याचे पाय मागे ओढण्याची प्रवृत्ती वाढलेली दिसत आहे एकमेकाविषयीचा द्वेष वाढलेला दिसत आहे या सर्व गोष्टी सामाजिक एकोप्यास घातक आहे जगद्गुरु संत ज्ञानेश्वराने हे विश्वचि माझे घर असे म्हटलेले आहे राष्ट्रीय संत भगवान बाबा, श्री गुरु बंकट स्वामी महाराज या सर्व साधू संताने समाज जोडण्याचे काम केले आज आपल्या छत्रपती शिवाजी महाराज, शाहू फुले व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेली शिकवण मनात सतत ठसत राहावी म्हणून आपल्या मनातील द्वेष, मत्सर व भेदाभेद या भावनेची होळी करून सामाजिक सलोखा वएकोपा निर्माण करणे आवश्यक आहे असे माजी सरपंच प्राध्यापक तात्यासाहेब डोईफोडे यांनी प्रसिद्धी माध्यमांना दिलेल्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे म्हटले आहे.

# किती विनाअनुदानित शिक्षकांचा बळी घेतल्यावर सरकार वाढीव टप्प्यासाठी आर्थिक तरतूद करणार

### विनाअनुदानित शिक्षकांचा संतप्त सवाल; वाढीव टप्पा अनुदानासाठी भरीव आर्थिक तरतूद करा; अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यातील एका विनाअनुदानित शाळेत काम करणाऱ्या नागरगोजे नावाच्या शिक्षकांनी वेतनासाठी आत्महत्येचे टोकाचे पाऊल उचलले ही महाराष्ट्रासाठी अत्यंत खेदाची आणि चिंताजनक बाब आहे. या सरकारला अजून किती विना अनुदानित शिक्षकांचा बळी घेतल्यानंतर विना अनुदानित शाळेत काम करणाऱ्या शिक्षकांना वाढीव टप्प्यासाठी लागणारी आर्थिक तरतूद करणार? शिवाय शंभर टक्के अनुदान कधी देणार? असा संतप्त सवाल महाराष्ट्र राज्य विना अनुदानित शाळा कृती समितीचे छत्रपती संभाजीनगर विभागाचे कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे, बीड जिल्हा अध्यक्ष आत्माराम वाव्हळ, उपाध्यक्ष भागवत यादव यांनी केला आहे.**

बीड जिल्हासह महाराष्ट्रामध्ये हजारो विनाअनुदान तत्त्वावर सुरू असलेल्या शाळेमध्ये लाखोंच्या संख्येने शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी काम करत आहे. या सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी पगारासाठी आपल्या हक्काच्या वेतनासाठी वारंवार आंदोलन केली. तेव्हा सरकारने अनुदान जाहीर केले. परंतु अनुदान जाहीर केल्यापासून अजतागायत १००% अनुदान देण्यापासून वंचित ठेवले आहे. सध्या जे शिक्षक २०% ४०% ६०% टक्के अनुदानावर काम करत आहेत. त्या शिक्षकांना पुढील वाढीव टप्पा अनुदान मिळावे यासाठी या सर्व शिक्षकांनी मागच्या वर्षी तब्बल पाच ते सहा महिने सातत्याने आंदोलन केले. तेव्हा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सरकारने आचारसंहिता लागण्यापूर्वी या सर्व शिक्षकांना वाढीव टप्पा अनुदान घोषित केले. तसेच या संदर्भात १० ऑक्टोबर २०२४ रोजी शासन आदेश काढला. परंतु अद्यापही वाढीव टप्पा अनुदानासाठी लागणाऱ्या निधीची तरतूद केली नाही. त्यामुळे अनुदानाचा टप्पा वाढला असला तरी अद्याप शिक्षकांच्या वेतनात वाढ झाली नाही. त्यामुळे वाढीव टप्पा अनुदानापासून हे सर्व शिक्षक वंचित राहिले आहेत. सरकारच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये वाढीव टप्पा अनुदानासाठी लागणाऱ्या आर्थिक निधीची तरतूद होईल असे वाटत होते. परंतु निधीची तरतूद न झाल्यामुळे या शिक्षकांच्या पदरी निराशा आली. एकीकडे अनुदान नाही दुसरीकडे

कुटुंबांचा खर्च भागविणे अवघड होत चालले आहे. त्यामुळे हे सर्व शिक्षक चिंताग्रस्त झाले आहे.

निराशाच्या गर्गेत जीवन जगत आहेत. या निराशेतूनच काल बीड जिल्ह्यातील एका विनाअनुदान शाळेत काम करणाऱ्या धनंजय नागरगोजे नावाच्या शिक्षकांनी आत्महत्ये सारखे टोकाचे पाऊल उचलले. सरकारने जर जाहीर केलेल्या वाढीव टप्पा अनुदानासाठी लागणाऱ्या आर्थिक निधीची तरतूद केली असती तर धनंजय नागरगोजे यांचा जीव वाचला असता. एकंदरीत

या सरकारला विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांच्या बाबतीत गांभीर्य नसल्याचे दिसून येत आहे. विविध टप्प्यावर काम करत असणाऱ्या शिक्षकांना शंभर टक्के अनुदान कधी देणार? अजून किती विना अनुदानित शिक्षकांचा बळी गेल्यावर सरकार विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांच्या पगारासाठी लागणारी आर्थिक तरतूद करणार ? तसेच या सरकारला अजून किती शिक्षकांचा बळी घ्यायचा ? असा संतप्त सवाल मराठवाडा विभागाचे विभागीय अध्यक्ष वैजनाथ चाटे, छत्रपती संभाजी नगर विभागाचे कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे, छत्रपती संभाजी नगर विभागाचे निरीक्षक विजयसिंह शिंदे महिला संघटनेच्या महिला आघाडीच्या मराठवाडा संघटक मुक्ता मोटे, दैवशाला मुंडे, सुरेखा गायकवाड मॅडम, मस्के मॅडम, बीड जिल्हा अध्यक्ष आत्माराम वाव्हळ, जिल्ह्याचे पदाधिकारी सौंदलकर, शेख, जिल्हा उपाध्यक्ष रामदास जामकर, पंकज कळसकर, बीड तालुकाध्यक्ष भागवत यादव, वडवणी तालुका अध्यक्ष वैजिनाथ शिंदे, गेवराई तालुका अध्यक्ष दीपक गरूड, आष्टी तालुका अध्यक्ष रविंद्र भुकन, पठाण, मोरे, गवळी, बाळासाहेब नागरगोजे, प्रताप देशमुख, श्रीराम जाधव, गोविंद आघाव, भालके, सुरेश कदम, जावेद पठाण, मुंडे यांच्यासह आदींनी उपस्थित केला आहे. दरम्यान तातडीने वाढीव टप्पा अनुदानासाठी भरीव आर्थिक तरतूद करावी अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने देण्यात आला.

# श्रीक्षेत्र अंजनवती येथील दींडी सोहळ्याचा शुभारंभ

बीड । प्रतिनिधी

दरवर्षीप्रमाणे आज दिनांक १४ मार्च रोजी सायंकाळी चार वाजता श्रीसंत तुकाविप्र महाराजांच्या मठापासून वाजत गाजत व मोठ्या उत्साहात पालखी निघाली असून गावामधे ठिकठिकाणी गावकऱ्यांच्या वतीने पालखीचे स्वागत करण्यात येऊन नाश्ता व चहापाण्याची व्यवस्था करून मनोभावे पालखीचे पूजन करण्यात आले यामधे संतोष विनायकराव येडे पाटील,बालाजी विनायकराव येडे पाटील,रामहरी अच्युतराव येडे पाटील,बाजीराव अच्युतराव येडे पाटील,अशोक माणिकराव शिंदे,बाळासाहेब माणिकराव शिंदे,हनुमान श्रीपतीराव शिंदे,बन्सीधर श्रीरंगराव शिंदे,भगवान रामचंद्र थोरात आदी भक्तांनी मनोभावे पालखीची सेवा केली,नामदेवे रचिला पाया! तुकाविप्र झालासे कळस!! अशी ही संत परंपरा असून श्रीसंत नामदेव महाराजांनी कोटी अभंग रचण्याचा संकल्प केला त्यांच्या अवतार कार्यात अभंग पूर्णत्वास न गेल्यामुळे त्यांनी जगद्गुरु तुकाराम महाराजांच्या रूपाने अवतार घेतला या अवतारातही अभंग रचण्याचा संकल्प अधुरा राहिल्यामुळे त्यांनी श्रीसंत तुकाविप्र महाराजांच्या रूपाने बीड जिल्ह्यातील बालेघाट परिसरात श्रीक्षेत्र अंजनवती येथे या अभंग रचनेच्या संकल्पचा शेवट केला त्यामुळे वारकरी संप्रदायामध्ये श्रीसंत तुकाविप्र महाराजांच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या श्रीक्षेत्र अंजनवती भूमीस अनन्यसाधारण महत्त्व आहे वास्तविक पाहता येथील विप्र घराण्याची परंपरा फार मोठी असून शांतीब्रह्? श्री संत एकनाथ महाराजांनी आपली मुलगी भागीरथीबाई यांचा विवाह विप्र घराण्यात लावून दिल्यामुळे श्रीक्षेत्र पैठण व श्रीक्षेत्र अंजनवती यांची अध्यात्मा बरोबरच कौटुंबिक नाळ जोडलेली आहे जगद्गुरु तुकोबाराय



म्हटल्याप्रमाणे शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी या उक्ती प्रमाणे पुढे याच घराण्यात श्री संत तुकाविप्र महाराजांनी अवतार घेतला ही परंपरा शेकडो वर्षांची असून नुकतीच तूकाविप्र महाराजांची २३३ वी पुण्यतिथी संपन्न झाली आहे तुकाविप्र महाराजांनी बालाघाट परिसरासह महाराष्ट्र,कर्नाटक व आंध्रप्रदेश आदी राज्यांमध्ये भजन,पूजन व कीर्तनाच्या माध्यमातून समाजजागृती करत भागवत धर्माच्या माध्यमातून वारकरी संप्रदायाचे विचार अखंडपणे तेवत ठेवले पंढरीचा विठुराया व एकमुखी दत्तप्रभूंचा वारसा व परंपरा जोपासणाऱ्या या संस्थानासाठी श्री केशवबुवा विप्र,श्री विठ्ठलबुवा विप्र यांच्याबरोबरच स्वर्गीय प्रभाकरबाबा विप्र,स्वर्गीय भानुदासकाका विप्र यांनीही अथक परिश्रम घेतलेले आहेत मात्र मठाधिपती योगीसूत कुमार महाराज विप्र यांनी स्वतःच्या नोकरी व्यवसायातील जवळपास पाचलक्ष रुपये खर्च करत श्रीसंत तुकाविप्र महाराजांचे वांड:मय पुस्तकरूपाने जगासमोर आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे वास्तविक पाहता अशा पुरातन व पवित्र वारसा असणाऱ्या संस्थानाची राज्यात व जनमानसात म्हणावी तेवढी प्रसिद्धी झालेली नसली तरी काही व्यक्तिमत्त्वांनी कार्यक्षेत्र वाढविण्याचे प्रामाणिक प्रयत्न चालवले आहेत याचाच एक भाग म्हणून श्रीसंत तुकाविप्र महाराज पालखी प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा दिंडीचालक ह.भ.प.अर्जुन महाराज पाटील हे गेली २४ वर्षापासून श्रीक्षेत्र पंढरपूर व श्रीक्षेत्र पैठण असा पालखी सोहळा अंजनवती तसेच पंचक्रोशीतील भाविक भक्तांना सोबत घेऊन अखंडपणे चालवण्याचे धार्मिक कार्य पार पाडत आहेत यावर्षी दिंडी अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण करत असल्यामुळे पालखी प्रतिष्ठान व गावकऱ्यांच्या वतीने लवकरच श्रीक्षेत्र अंजनवती येथे राज्यव्यापी धार्मिक व संस्कृतिक सोहळ्याचे आयोजन करण्यात येणार असून सदरील सोहळ्यासाठी देशभरातून विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींची उपस्थिती लाभणार असून श्री संत तुकाविप्र महाराजांचे जीवन कार्य व अध्यात्मिक कार्य जगासमोर येणार आहे हाच उद्देश डोळ्यासमोर ठेवून हा भव्य दिव्य सोहळा पार पाडण्याची आपल्या सर्वांची जबाबदारी आहे मठामधील व्यवस्थापक धनंजय कुलकर्णी पती-पत्नींच्या प्रयत्नातून परिसरात निर्माण झालेल्या अतिशय प्रसन्न वातावरणामधे श्रीसंत तुकाविप्र महाराजांच्या मठापासून वाजत गाजत निघालेल्या दिंडीचा आज मुक्काम गावातील मारुती मंदिरामधे असून ह.भ.प.आनंदराव महाराज येडे तथा संत यांचे कीर्तनाला सुरूवात झाली असून उद्या सकाळी ९ :०० वाजता दिंडी श्रीक्षेत्र पैठणकडे मार्गस्थ होईल तरी अंजनवतीसह पंचक्रोशी व बालाघाट परिसरातील श्रीसंत तुकाविप्र महाराजांच्या भक्तगणांनी मोठ्या प्रमाणावर दिंडीमध्ये सहभाग नोंदवावा अशी विनंती अंजनवती ग्रामस्थांच्या वतीने करण्यात येत आहे .

पान ६ वरून...

### माजलगावात राजे मल्हारराव

ॲड.गणेश सजगणे,शंकर गावडे,दत्ता आबुज, सत्यनारायण उनवणे,रवींद्र खोडवे,सुरेशराव सोळंके,प्रल्हाद दळवी,ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष विलास नेमाणे, भगवानराव धरपडे, लक्ष्मण सरवदे, खेलबा काळे, गोविंद गोचडे, डॉ.सखाराम गायकवाड,हनुमान गावडे,तुषार जाधव,नवनाथ भेटे,अविनाश कांबळे,हरी गलांडे, सुशील गाडे,पेंटर पंकज साळवे, मनोज सोळंके सुखदेव शेळके अहिल्या राजे नेमाणे,यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

### कुंडलिका व सीना नदीवरील

पोलिस बंदोबस्तात सुरू होईल, असे प्रशासनाने जाहीर केले आहे.याप्रसंगी उपोषण करणारे सामाजिक कार्यकर्ते समस्त महाजन संस्थेच्या नुतन देसाई, कुंडलिका सीना फाऊंडेशन चे उदय शिंदे, धीरज शर्मा, जगदीश गौड, राजेंद्र अग्रवाल यांच्याशी डॉ. काळे यांनी प्रदीर्घ चर्चा केली. यावेळी उद्योजक घनशाम गोयल, योगा साधक तज्ञ तथा योगा शिक्षक देवा चित्राल, शिवरतन मुंदडा, सुनिल रायठठ्ठा, डॉ रितेश अग्रवाल, डॉ विठ्ठल राजकर, प्रतिभा श्रीपत, डॉ संजय अंबेकर, मनोहर सरोदे, आशिष पाठक, नयन पाटील यांच्यासह मोठ्या संख्येत शहरवासीयांची उपस्थिती होती. या निर्णयामुळे नदीपात्रात अतिक्रमण करणाऱ्यांवर कठोर कारवाई होणार असून, जालना शहर व परिसरातील जलस्त्रोतांचे संरक्षण आणि पुनरुज्जीवनाला गती मिळणार आहे.

### अभियांत्रिकी महाविद्यालयात

योगा व प्राणायाम याचे महत्त्व आणि बदलत्या जीवनशैलीबद्दल विस्तृत असे मार्गदर्शन करून महिला भगिनींच्या अनेक प्रश्नांची उकल करून दिली.यावेळी डॉ.अरुणाताई केंद्रे,डॉ अर्चनाताई थोरात यांनी सुद्धा स्तानाचा, गर्भाषयाचा कर्करोग व महिला भगिनींच्या इतर आजारासंबंधी मार्गदर्शन केले.या कार्यक्रमास अभियांत्रिकी महाविद्यालयातील जवळपास ५०० विद्यार्थिनी उपस्थित होत्या. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आय एम.ए.अंबाजोगाई व रोटरी क्लबचे अध्यक्ष कल्याण काळे, सचिव धनराज सोळंकी व इतर सदस्यांनी परिश्रम घेतले.या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

### शिक्षक क्षमतावृद्धी प्रशिक्षणार्थींना

भाषांतरित असलेल्या कुरआन या पवित्र धर्मग्रंथाच्या प्रति ट्रेनर व प्रशिक्षणार्थींना मोफत वाटप करण्यात आल्या.

याप्रसंगी हायस्कूलचे शेख हमीद सर,युनूस खान सर,शेख मसूद सर यांच्या उपस्थितीत वडवणी तालुक्यातील शिक्षक प्रशिक्षणार्थी प्रा.राहुल कांबळे,प्रा.मुंडे सी.व्ही.,प्रा.अंडील जी.पी.,प्रा.विनायक डाके,प्रा.नागनाथ सोळंके,प्रा.मस्के,श्री.तांबडे सर,श्री. प्रदीप काळे सर,श्री.मंत्रे सर,प्रा.शिवाजी राठोड,प्रा.पवार बी.आर.,प्रा.चोपडे,प्रा. जोगदंड,श्री.शिंदे सर,श्रीमती शोभा आंधळे मॅडम,प्राध्यापिका कचरे मॅडम,श्रीमती चांदेकर मॅडम,श्री.यादव सर,श्री.कुरकुटे सर यांच्यासह अनेक शिक्षक शिक्षिकाना कुरआन ग्रंथांच्या प्रती देण्यात आल्या. अलहुदा उर्दू हायस्कूलने राबवलेल्या या नावीन्यपूर्ण उपक्रमाचे सर्वत्र चर्चा होत आहे.

----------

## यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय विचाराची आज महाराष्ट्राला गरज –प्राध्यापक डॉ कल्पना घारगे

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयात राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभागाच्या वतीने प्राचार्य डॉक्टर विश्वास कदम यांच्या मार्गदर्शनाखाली व प्राचार्य प्राध्यापक सोमनाथ घाडगे यांच्या उपस्थितीत महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री माननीय यशवंतराव चव्हाण साहेब यांची ११२ वी जयंती व साजरी करण्यात आली या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाच्या लोकप्रशासन विभागाच्या विभाग प्रमुख प्राध्यापक डॉक्टर कल्पना घारगे या होत्या तर सांस्कृतिक विभागाचे प्रमुख प्राध्यापक डॉक्टर रामकृष्ण प्रधान प्राध्यापक बापू घोक्षे डॉक्टर



वंदनराव जाधव डॉक्टर प्राध्यापक सय्यद एस आर डॉक्टर सुनील जाधव प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते या कार्यक्रमात डॉक्टर कल्पना घारगे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना महाराष्ट्रात आज वैचारिक राजकारणाची निर्माण करण्यासाठी ह आज यशवंतराव चव्हाण यांच्या नैतिक राजकीय विचाराची गरज आहे यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राशिवाय देशाची राजकारण स्वच्छ आणि चारित्र्यसंपन्न राजकीय विचाराची निर्मिती केली असे मनोगत व्यक्त केले या कार्यक्रमाचे संचालन डॉक्टर लोखंडी देवी यांनी केले तर आभार प्राध्यापक रामकृष्ण प्रधान यांनी मान्य या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मानसाने पाप कर्म न करता सदाचाराचे जिवन जगले पाहिजे–पुज्य भदन्त शरणानंद महाथेरो

माजलगाव । प्रतिनिधी

भारतीय बौद्ध महासभा तालुका माजलगावच्या वतिन सांची बुद्ध विहार डॉ आंबेडकर भवन केसापुरी वसाहत येथे सातत्यान डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची चळवळ गतीमान करण्यासाठी विविध उपक्रम राबवले जातात याचा एक भाग म्हणुन दि.१४ मार्च २०२५ वार शुक्रवार रोजी फाल्गुण पौर्णीमा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली या कार्यक्रमास प्रमुख धम्मदेशना देण्यासाठी पुज्य भदन्त शरनानंद महाथेरो हे उपस्तीत होते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा तालुका अध्यक्ष डॉ भागवत साळवे हे होते पुज्य भदन्त शरनानंद महाथेरो आपल्या धम्मदेशनेत मनुष्याने पापकर्म न करता सदाचाराचे जिवन जगले पाहीजे आसे प्रतिपादन केले



ते पुढे बोलताना म्हणाले कि बुद्धा चा धम्म हा शुद्ध जिवन जगण्याचा मार्ग आहे तो परिपुर्ण अंगीकारला पाहिजे तसेच मानुष्या ची वानी शुद्ध व पवित्र आसली पाहीजे. तर या कार्यक्रमास भारतीय बौद्ध महासभे च्या जिल्हा संस्कार उपाध्यक्ष आद.लिलाताई उजगरे,जिल्हा संस्कार सचिव शामभाऊ वाघमारे,जिल्हा पर्यटन सचिव आद.के व्ही साळवे ,एन बी राजभोज, आंगनवाडी परिवेक्षिका मोरे ताई , शिवाजी मोरे हे उपस्तीत होते या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन तालुका सरचिटणीस सिद्धार्थ वक्ते यांनी केले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गुलाब धाईजे,नितिन डोंगरे, दयानंद साळवे,मोहन काकडे, बाबासाहेब घनघाव,गणपत भालेराव,डी पी वाघमारे,डी पी पोटभरे,बळीराम काकडे,शरद उजगरे,संभाजी धाईजे,रमाताई राजभोज,पोहरेताई, गायसमुद्रेताई ,यांनी परिश्रम घेतले.

# महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात द्यावे; भव्य मोर्चाद्वारे राष्ट्रपतींकडे मागणी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

भारतीय बौद्ध महासभा आणि वंचित बहुजन आघाडी बीड जिल्हा पुर्व च्या वतीने उपविभागीय कार्यालयावर मोर्चा काढण्यात येवून महामहीम राष्ट्रपती भारत सरकार यांना निवेदन देण्यात आले.



बोधगया येथील महाबोधी महाविहाराचे नियंत्रण आणि व्यवस्थापन बौद्धांच्या ताब्यात देऊन कायद्यात बदल करण्यात यावा.सम्राट अशोक ह्यांनी इ.स. पूर्व तिसऱ्या शतकात महाबोधी महाविहाराचे बांधकाम केले. तथागत बुद्धाला ज्या बोधीवृक्षाखाली ज्ञानप्राप्ती झाली तो बोधीवृक्ष याच महाबोधी महाविहार परिसरात आहे. त्यामुळे देशातील नव्हे, तर जगभरातील बौद्ध अनुयायी भिक्खू आणि पर्यटक या स्थळाला भेट देतात; मात्र या महाविहाराचे नियंत्रण आणि व्यवस्थापन आजही बौद्धांच्या ताब्यात नाही. महाबोधी विहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे, यासाठी १९९२पासून आंदोलन होत आहेत. तरी सुद्धा महाबोधी विहार व्यवस्थापन कायदा बदलण्यात आला नाही. त्यामुळे पाच हिंदू धर्मीय ह्यांचे प्राबल्य असल्याने बौध्द गया येथील महाविहार येथे पंडे आणि ब्राम्हणवादी पुजा आणि कर्मकांड करीत असतात. त्यामुळे ज्या रूढी परंपरा ह्यांना तथागत गौतम बुद्ध ह्यांनी नाकारले तीच कर्मकांड येथे सुरू आहेत.

जागतिक वारसा म्हणून मान्यता प्राप्त बौध्द गया येथील महाविहार व्यवस्थापन कायदा तातडीने बदलण्यात यावा अशी आमची मागणी आहे. याकरीता सदर आंदोलन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू ॲड. प्रकाश आंबेडकर तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्या मार्गदर्शन व आवाहनानुसार तसेच भारतीय बौद्ध महासभा राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ. भिमराव आंबेडकर ह्यांचे पुढाकाराने तसेच समता सैनिक दल व विविध बौद्ध संघटना यांच्यावतीने आज दि. १२ मार्च २०२५ रोजी देशभरातील बौद्धांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर भारतीय बौद्ध महासभा व वंचित बहुजन आघाडीच्यावतीने संयुक्तरित्या आंदोलन करीत आहोत.

आमच्या मागण्या पुढील प्रमाणे आहेत.

१. महाबोधी महाविहार (बोधगया, बिहार) हे पवित्र बौद्ध धर्मस्थळ असून, बोधगया महाविहार कायदा १९४९ चा अन्यायकारक कायदा रद्द करावा.

२. बोधगया येथील महाबोधी महाविहाराचे नियंत्रण आंतरराष्ट्रीय बौद्धांना सोबत घेऊन बौद्धांच्या ताब्यात द्यावे.

३. जागतिक वारसा अबाधित ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणात विशेष विकास निधी आणि सुविधा तात्काळ देण्यात याव्यात.

आपला देश स्वातंत्र्य झाल्यावर २६ जानेवारी १९५० पासून घटना लागू झाली आहे. त्यावेळी भारतीय राज्यघटनेचे कलम १३ नुसार घटना लागू होण्यापूर्वी केलेले सर्व कायदे आणि नियम निरस्त केले आहेत. मात्र तरी देखील देशात १९४९ चा नियमबाह्य कायदा लावून बौध्द समूहाचे धार्मिक अधिकार काढून घेण्यात आले आहेत.आपण देशाच्या प्रमुख आहात, याकरीता केंद्र सरकार आणि बिहार सरकारने आपले विशेष अधिकार वापरून १९४९ चा कायदा दुरुस्त करण्याचे आदेश देण्यात यावा. म्हणून आपणांस हे निवेदन सादर करण्यात येत आहे.

# युसूफवडगांव विद्यालयाचे इंटरनॅशनल मॅथ ऑलिम्पियाड स्पर्धा परीक्षेत घवघवीत यश

**युसूफवडगांव । प्रतिनिधी**

**केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील युसुफवडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयने नॅशनल सायन्स ओलंपियाड फाउंडेशन,नवी दिल्ली मार्फत घेण्यात आलेल्या इंटरनॅशनल मॅथ ओलिंपियाड स्पर्धा परीक्षेत घवघवीत यश प्राप्त केले असून,विद्यालयाच्या एकूण पाच विद्यार्थ्यांनी यामध्ये यश प्राप्त करून सुवर्णपदके पटकावले आहेत.**



यामध्ये इयत्ता सातवी मधून प्रथम कु.पाटील श्रेया मन्मथ,इयत्ता नववी मधून प्रथम कु.थळकरी सिद्धी सचिन,इयत्ता दहावी मधून प्रथम कु.चोपने मोहिनी श्रीमंत,द्वितीय कु.थळकरी सिद्धी चंद्रकांत,तर तृतीय चि.रोडगे हर्षवर्धन सोमनाथ यांनी क्रमांक पटकाविले असून,या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना नॅशनल सायन्स ओलंपियाड फाउंडेशन नवी दिल्ली मार्फत गोल्ड मेडल तसेच अप्रिसिएशन प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहेत.नुकताच या परीक्षेचा निकाल लागला असून तसे नॅशनल सायन्स ओलंपियाड फाउंडेशन नवी दिल्ली मार्फत विद्यालयास कळविण्यात आलेले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्था सचिव दीपक दादा घुमरे,संस्था अध्यक्ष सुकाळे यु.बी,प्राचार्य भोसले ए.यु,उपप्राचार्य श्रीमती जाधवर एम.एस,पर्यवेक्षक खरबड आर.बी,उच्च माध्यमिक विभाग प्रमुख चव्हाण.एन .एन,सर्व शिक्षकवृंद पालक व नागरिक यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे.

cmyk

# पोल्ट्री फार्ममध्ये बर्ड फ्लूला रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय

'बर्ड फ्लू' हा एक संसर्गजन्य रोग असून तो सर्व प्रकारचा पक्षांमध्ये संक्रमित होतो. हा रोग एच ५ एन १ या विषाणूमुळे होतो.

काय असतात बर्ड फ्लूची लक्षणे : प्रथमता कोंबड्यांचे खाणे पिणे बंद होऊन त्या सुस्तावतात. नाकातोंडातून रक्त मिश्रित श्राव बाहेर येतो. तोंडाचा व डोक्याचा भाग सुजलेला दिसतो. डोळ्याच्या पापण्याच्या आतील भाग लाल होतो वा सुजलेला दिसतो. विष्ठा हिरव्या रंगाची होते व पायांना सूज येते. पक्षी चालताना अडखळतात. पंख विखूरतात व गळतात. पक्षी निस्तेज दिसतात. अंडी उत्पन्न कमी होते. श्वसनाचा त्रास होतो, शिंका येतात व श्वास घेताना घर घर आवाज येतो.

श्वास घेण्यास अडथळा येऊन पक्षी दगावतात.

प्रतिबंधत्मक उपाय : बर्ड फ्लूने नियंत्रित जैव सुरक्षाविषयक उपाययोजनांचे कडकपणे पालन केले गेले पाहिजे. पक्षी सध्या संक्रमित नसले तरी सर्व कुकुट पालकांनी आपल्या फार्मवर प्रतिबंधात्मक उपाय केले पाहिजेत. १) कुक्कुटपालनात एक समान वयोगटाचे पक्षी पाळण्याचे धोरण अवलंबावे याला 'ऑल इन' 'ऑल आउट' उत्पादन प्रणाली



म्हणतात. यात एक दिवसाची पिल्ले आणून ती सर्व एकाच दिवशी विकायची. २) देशी, बॉयलर आणि अंडी देणारे पक्षी जंगली किंवा स्थलांतरित पक्षांच्या संपर्कात येऊ देऊ नयेत. ३) वन्य पक्ष्यांचा वावर असलेल्या व त्यांच्यामुळेच दूषित होण्याची शक्यता असलेल्या पाण्याच्या कोणत्याही स्त्रोतापासून कोंबड्यांना दूर ठेवावे फार्मवर जंगली पक्षांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय करू नये. ४) केवळ आवश्यक कामगार आणि वाहनांना फार्मवर प्रवेश करण्याची परवानगी द्यावी. ५)फार्मवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना स्वच्छ कपडे आणि निर्जंतुकीकरण याच्या सुविधा पुरवाव्यात फार्मवर प्रवेश करताना व बाहेर पडताना उपकरणे आणि वाहने पूर्णपणे स्वच्छ आणि निर्जंतुक करावे. ६) फार्मच्या कंपन्यातील गेटवर वाहन निर्जंतुकीकरणासाठी व्हेईकल डीप तयार करावे. त्यात पोटॅशियम परमॅग्नेट चे द्रावण भरलेले असावे. फार्म वर येणाऱ्या सर्व वाहनांचे त्या द्रावणातून येतील ते पहावे. ७) संक्रमित परिसरात विषाणूचे प्रमाण कमी होण्याकरिता सोडियम हायपोक्लोराइड दोन टक्के केव्हा फॉर्मेलीन चार टक्के यासारख्या जंतूनाशक फवारणी नियमितपणे कराव्यात.

त्यातून निर्जंतुकीकरणाला मदत होते. ८) सात ग्रॅम धुण्याचा सोडा प्रति लिटर पाणी याप्रमाणे मिश्रणामध्ये फार्म परिसर, नाले, गावातील गटारी व इतर स्थळांमध्ये फवारणी करावी ही फवारणी दर पंधरा दिवसांनी केल्याने विषाणूंचा प्रादुर्भाव कमी होण्यास मदत होते. ९) अन्य कोणत्याही फार्मवर उपकरणे किंवा वाहने खाद्य पाणी यांची देवाण-घेवाण टाळावे. १०) अन्न पोल्ट्री फार्मला भेट देणे टाळावे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१५२७ : खांडवा येथील युद्धात मुघल सम्राट बाबर यांनी चित्तौडगढचे शासक राणा संग्राम यांचा पराभव केला.
१७८२ : इस्ट इंडिया कंपनी आणि मराठा शासक यांच्यात सालाबाईचा तह झाला.
१८४५ : ब्रिटीश शोधक आणि उद्योगपती स्टीफन पेरी यांनी रबर बँडसाठी पेटंट प्राप्त झाले होते.
१९५७ : व्हॅनगार्ड-१ या अमेरिकेच्या पहिल्या सौरउर्जाचलित उपग्रहाचे प्रक्षेपण झाले.
१९४४ : भारतीय नौदल अभियांत्रिकी संस्था आय. एन. एस. शिवाजीची लोणावळा येथे स्थापना.
१९५८ : 'व्हॅनगार्ड-१' या अमेरिकेच्या पहिल्या, एकूण चौथ्या आणि पहिल्या सौरऊर्जाचलित उपग्रहाचे प्रक्षेपण
१९६९ : गोल्डा मायर या इस्त्रायलच्या पहिल्या महिला प्रधानमंत्री बनल्या.
१९८७ : भारतीय क्रिकेटपटू सुनील गावस्कर यांनी क्रिकेट खेळापासून सन्यास घेतला.
१९९७ : मुंबईत वातानुकुलित टॅक्सी सेवेचा शुभारंभ

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८६४ : भारतीय अभियंता जोसेफ बाप्टीस्ता यांचा जन्म.
१९०९ : रामचंद्र नारायण दांडेकर भाषातज्ज्ञ आणि वैदिक संस्कृतीचे अभ्यासक (मृत्यू: ११ डिसेंबर २००१)
१९२० : बांगला देशाचे राष्ट्राध्यक्ष शेख मुजीबर रहमान.
१९२७ : 'विश्वास' स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे पुत्र (मृत्यू:)
१९४६ : महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांचा जन्मदिन.
१९६२ : भारतीय अमेरिकी अंतरीक्ष यात्री कल्पना चावला यांचा जन्मदिन.
१९७५ : भारतीय अभिनेता, गायक पुनीथ राजकुमार यांचा जन्म.
१९७९ : शर्मन जोशी अभिनेता
१९९० : भारतीय बॅडमिंटनपटू साइना नेहवाल यांचा जन्मदिवस.
१९१२ : मिस्टर युनिव्हर्सचे जेतेपद पटकाविणारे पहिले भारतीय बॉडीबिल्डर मनोहर आयच यांचा जन्मदिवस.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१२१० : आदिनाथ संप्रदायाचे प्रवर्तक मत्स्येन्द्रनाथ (मच्छिंद्रनाथ) यांनी सातारा जिल्ह्यात मत्स्येन्द्रगड येथे समाधी घेतली. चैत्र व. ५ (जन्म:)
१७८२ : डॅनियल बर्नोली डच गणितज्ञ (जन्म: ८ फेब्रुवारी १७००)
१८८२ : विष्णूशास्त्री चिपळूणकर आधुनिक मराठी गद्याचे जनक, ग्रंथकार आणि 'केसरी'चे एक संस्थापक. चित्रशाळा, आर्यभूषण छापखाना, किताबघर यांसारखे अनेक समाजोपयोगी उपक्रम त्यांनी सुरू केले. (जन्म: २० मे १८५०)
१९१० : अनुताई वाघ समाजसेविका (जन्म: २७ सप्टेंबर १९९२)
१९३७ : 'चंद्रशेखर' शिवराम गोर्हे बडोद्याचे राजकवी, 'गोदागौरव' आणि 'कविता रति' ही त्यांची विशेष गाललेली काव्ये आहेत. (जन्म: २६ जानेवारी १८९१)
१९५६ : आयरिन क्यूरी नोबेल पारितोषिक विजेत्या फ्रेन्च भौतिकशास्त्रज्ञ (जन्म: १२ सप्टेंबर १८९७)
१९५७ : रॅमन मॅगसेसे फिलिपाइन्सचे ७ वे राष्ट्राध्यक्ष (जन्म: ३१ ऑगस्ट १९०७)
१९७७ : भारतीय शास्त्रीय संगीत गायिका सिद्धेश्वर देवी यांचे निधन.
२००० : 'राजकुमारी' दुबे पार्श्वगायिका व अभिनेत्री (जन्म:)
२०१६ : इंग्लंड देशातील इंग्रज जादुगार पॉल डॅनियल्स यांचे निधन.

# उन्हाळी हंगामात नागरमोथा, हाराळी आणि कुदा या तणांचे नियंत्रण



शेतीतील तण नियंत्रण, विशेषत: उन्हाळी हंगामात, एक अत्यंत महत्वाचा मुद्दा आहे. विविध प्रकारच्या तणांनी पिकांच्या वाढीला अडथळा आणला, उत्पादनावर परिणाम केला आणि शेतीच्या खर्चातही वाढ केली. यामध्ये नागरमोथा, हाराळी आणि कुदा यांचे नियंत्रण करण्याची गरज असते.

उन्हाळी हंगामात तण नियंत्रणाची सुरवात : उन्हाळ्याच्या हंगामात, अनेक शेतकऱ्यांना वेगवेगळ्या प्रकारची तणे त्यांच्या शेतांमध्ये दिसतात. विशेषत: तणांची वाढ या हंगामात अधिक होऊ शकते कारण पाणी कमी असल्यामुळे जमीन हलकी होते आणि तण अधिक प्रमाणात उगवतात. अशा परिस्थितीत एक महत्वपूर्ण उपाय म्हणजे, शेतातील जमीन चांगली नागरून वखरून घेणे. वखरलेली आणि गाठलेली जमिन जाळा: शेतातील गाठी आणि काशा वेचून त्यांना जाळून टाकणे हे तणांच्या संख्येला कमी करण्याचा एक प्रभावी उपाय आहे. यामुळे तणाच्या मुळांवरही नियंत्रण मिळवता येते, तसेच त्यांच्या वाढीस अडथळा निर्माण होतो.

तणनाशकांचा वापर : नागरमोथा, हाराळी आणि कुदा या तणांचा प्रभावी नियंत्रणासाठी तणनाशकांचा वापर करणे अत्यंत फायदेशीर ठरू शकतो. त्यासाठी ग्लायफॉसेट हा तणनाशक खूप प्रभावी आहे. हे तणनाशक प्रामुख्याने कोवळ्या तणांवर प्रभावी असते, विशेषत: ते २ ते ४ पानांच्या अवस्थेत असताना.

ग्लायफॉसेट वापराची शिफारस : ग्लायफॉसेट तणनाशक हेक्टरी २. किलो प्रमाणात फवारावे. यासाठी बाजारात विविध ब्रॅण्ड्स उपलब्ध आहेत, जसे की ग्लायसेल, राऊंडअप, विडॉफ इत्यादी.

फवारणीचे योग्य वेळापत्रक : तणनाशक फवारल्यानंतर, कमीत कमी दोन तास पाऊस पडणार नाही, याची काळजी घ्या. यामुळे तणनाशक पिकात चांगले शोषले जाते आणि अधिक प्रभावीपणे कार्य करते.

तणनाशक फवारणीनंतर काय काळजी घ्यावी : ग्लायफॉसेट फवारल्यानंतर, पुढील काही आठवडे शेतामध्ये कोणतीही मशागत करणे टाळा. यामुळे तणनाशकाचा प्रभाव टिकतो आणि तणाचे नियंत्रण अधिक प्रभावी होते. फवारणी केल्यावर ३ ते ४ आठवडे काहीही मशागत करणे टाळल्यास, तणांच्या मुळांची पूर्णपणे नष्ट होण्याची शक्यता जास्त असते.


तणांचे नियंत्रण करण्यासाठी काही पर्यायी उपाय : जवळजवळ झाडींचे नियंत्रण: काही ठिकाणी झाडे आणि विविध वनस्पतींनी तणांचा वाढ थांबवता येतो. त्या व्यतिरिक्त, तणांचे नियंत्रण जैविक पद्धतीने देखील करू शकता. कंपोस्ट किंवा जैविक खतांचा वापर जास्त केल्यास तणांच्या वाढीस अडथळा आणू शकतो. विविध पीकांच्या वाफ्यावर विविध तणांचा प्रकोप असतो. त्यामुळे त्या पिकानुसार तणांच्या नियंत्रण योजनेची तयारी करणे आवश्यक आहे.

तण नियंत्रणासाठी योग्य तंत्रांचा अवलंब करणे शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. खासकरून उन्हाळी हंगामात, योग्य वेळेत वखर करणे आणि तणनाशकांचा वापर हा एक प्रभावी उपाय ठरू शकतो. तसेच, फवारणी नंतर काही आठवडे मशागत टाळणे तणाच्या नियंत्रणामध्ये मदत करेल. शेतीत तणांचा योग्य नियंत्रण पद्धतीने करणे हे अधिक उत्पादन मिळवण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे.

# योग्य खत वापरुन बटाट्याचा रोगांपासून करा बचाव

बटाटा हे आपल्या देशातील प्रमुख नगदी पीक आहे. याचा वापर प्रत्येक घराच्या स्वयंपाकघरात कोणत्या ना कोणत्या स्वरूपात केला जातो. बटाट्यामध्ये स्टार्च, प्रथिने, व्हिटॅमिन सी आणि खनिजे मोठ्या प्रमाणात असतात. अधिक उत्पादन देणाऱ्या वाणांची वेळेवर पेरणी, संतुलित प्रमाणात खतांचा वापर, योग्य कीटकनाशके आणि पाण्याचे योग्य व्यवस्थापन याद्वारे बटाट्याचे अधिक उत्पादन घेऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवता येते.बटाटा लागवडीत खताचा वापर : बटाटा लागवडीतून भरघोस उत्पन्न मिळविण्यासाठी शेतकरी खत आणि खत यांचे मिश्रण वापरू शकतात. यामध्ये प्रति बिघा २० किलो डीएपी, १४ किलो म्युरिएट ऑफ पोटॅश, २१ किलो युरिया, २ किलो झिंक सल्फेट, चार किलो फेरस सल्फेट, १ ते दीड किलो बोरॅक्स, एक किलो फोरेट १० ग्रॅम, दोन किलो गंधक आणि २० क्विंटलपर्यंत. शेणखत वापरता येते. लक्षात ठेवा की पेरणीनंतर युरियाचे तीन भाग करून अनुक्रमे २० दिवस, ४० दिवस आणि ५५ दिवसांनी फवारणी करावी.

बटाटे मध्ये चेचक रोग आणि प्रतिबंध : स्मॉलपॉक्स हा बटाट्यांमधील एक सामान्य रोग आहे. या रोगाच्या नियंत्रणासाठी शेतात कोणत्याही प्रकारचे कुजलेले अवशेष जसे गवत, पेंढा किंवा शेणखत इत्यादी ठेवू नयेत. रोग टाळण्यासाठी मध्यवर्ती उपचार देखील आवश्यक आहे. रोग टाळण्यासाठी



बटाट्याच्या बियांवर तीन टक्के बोरिक ॲसिडची प्रक्रिया करावी. बियाणे खराब असल्यास ते बदलून घ्यावे. चेचक ची लागण होणार नाही असे बियाणे लावा. ट्रायकोडर्माने मातीची प्रक्रिया करा. यासाठी पाच किलो ट्रायकोडर्मा दोन ते तीन क्विंटल शेणखतामध्ये मिसळून १० ते १२ दिवस ठेवा. रोगाचा प्रादुर्भाव झाल्यावर संपूर्ण एक हेक्टर क्षेत्रावर पसरवा. हे माती उपचार सुधारेल.

बटाट्यांमध्ये ब्लाइटची समस्या : ब्लाइट रोगाचे दोन प्रकार आहेत. लवकर अनिष्ट परिणाम आणि उशीरा अनिष्ट परिणाम. बटाटा पिकावर लवकर येणार्या तुषार रोगामुळे खालच्या आणि जुन्या पानांवर लहान अंडाकृती तपकिरी ठिपके दिसू लागतात. हळूहळू त्याचा परिणाम पानांवर आणि कंदांवर दिसून येतो. या रोगाचा प्रादुर्भाव झालेल्या कंदांमध्ये डागांच्या खालचा लगदा तपकिरी व कोरडा पडतो, तर उशिरा येणारा रोग हा बटाटा पिकाचा सर्वात गंभीर रोग आहे. या रोगाचा प्रादुर्भाव पाने, देठ व कंदांवर होतो. जेव्हा तापमान १० ते २० अंश सेल्सिअस असते आणि आकाशात ढग असतात तेव्हा हा रोग होण्याची शक्यता असते.

बटाट्यांमधील ब्लाइट टाळण्यासाठी उपाय :बटाट्यामध्ये हा रोग दिसून येताच ६००-८०० ग्रॅम ब्लिटॉक्स-५० किंवा मॅन्कोझेब २०० लिटर पाण्यात मिसळून प्रति एकर या प्रमाणात फवारणी करावी. १५ दिवसांच्या अंतराने पुन्हा फवारणी करावी. हा बटाट्याचा सर्वात विनाशकारी रोग आहे. उशीरा ब्लाइट रोगाचे मुख्य कारण म्हणजे फायटोफथोरा इन्फेस्टन्स नावाची बुरशी. हा रोग लेट ब्लाइट, ब्लाइट, एपिडेमिक आणि ब्लाइट इत्यादी नावांनी देखील ओळखला जातो.

# वाढत्या उष्णतेत अशी घ्या उसाची काळजी

मार्च ते जून या कालावधीत तीव्र उष्ण तापमान व पाण्याची कमतरता यामुळे उसाच्या विविध वाढीच्या अवस्थांवर परिणाम होतो. या कालावधीत सरीत पाचट पसरून त्यावर प्रतिटन पाचटासाठी ८ किलो युरिया, १० किलो सुपर फॉस्फेट आणि १ लिटर पाचट कुजवणाऱ्या जिवाणूचा वापर करावा. पाण्याच्या दोन पाळींतील अंतर २० दिवसांपेक्षा जास्त वाढणार नाही याची दक्षता घ्यावी.

पाणी व्यवस्थापन :मार्च ते जून या कालावधीत तीव्र उष्ण तापमान व पाण्याची कमतरता यामुळे उसाच्या विविध वाढीच्या अवस्थांवर परिणाम होतो. या कालावधीत तापमानात वाढ झाल्यामुळे पिकातील ओलाव्यात घट होते. या कालावधीत दिवस व रात्रीच्या तापमानातील फरक कमी होऊन रात्रीचे तापमान वाढलेले असते. जमिनीतील उपलब्ध पाणी कमी होऊन मुळाच्या जवळील तापमान वाढून त्यांची कार्यक्षमता कमी होते. परिणामी, मुळाद्वारे पाणी व अन्नद्रव्याच्या शोषणात घट होते. उसाच्या पानावरील पर्णरंध्राद्वारे होणारे बाष्पीभवन कमालीचे वाढते. आडसाली उसाच्या उत्पन्नावर विपरीत परिणाम होतो, कारण ऊस जोमदार वाढीच्या अवस्थेत असतो. पूर्वहंगामी ऊस देखील पूर्ण वाढीच्या अवस्थेत असतो. वाढ खुंटते, कांड्यांची लांबी व जाडी कमी होते. सुरू व खोडवा उसामध्ये तापमान वाढ झाल्यामुळे खोड किडीचा प्रादुर्भाव वाढतो. सुरू व खोडवा उसाला फूट कमी होऊन गाळप योग्य उसांची संख्या कमी मिळते, परिणामी उत्पादनामध्ये घट येते.

पाण्याच्या ताणाचे परिणाम : पाने बुडक्याकडून शेंड्याकडे वाळत जातात. मुळांची कार्यक्षमता घटते, त्यामुळे पाणी व अन्नद्रव्यांचे अपुरे शोषण व प्रकाश संश्लेषण क्रिया मंदावते.

अन्नरसाचे विविध भागांना होणारे वहन कमी होऊन, परिणामी कांड्याची व पानांची लांबी, रुंदी कमी होते. हरितद्रव्याचे प्रमाण घटते. तंतुमय पदार्थाचे प्रमाण वाढून उसात दशीचे प्रमाण वाढून



वजन, साखर उतारा घटतो. आडसाली, पूर्वहंगामी उसाची वाढ खुंटून कांड्यांची लांबी, जाडी कमी होते. सुरू, खोडवा उसात फुटव्यांचे प्रमाण कमी होऊन गाळपालायक उसाच्या संख्येत घट होते.

पीक व्यवस्थापन : बाष्पीभवन पात्राचा वापर करून एकूण ७५ मिमी बाष्पीभवन झाल्यावर पिकास पाणी द्यावे. समपातळीत सऱ्या सोडाव्यात. लागण व मोठी बांधणी मिळून हेक्टरी पाच ते सात टन गांडूळ खताचा वापर करावा. पाण्याच्या पाळीतील अंतर ठरवण्यासाठी टेंसीओमीटरचा वापर करावा. त्यामुळे प्रति हेक्टरी पाणी कमी लागते. पिकास पाण्याचा ताण सहन करण्याची सवय लावण्यासाठी डिसेंबरपासून फेब्रुवारीअखेर पर्यंत पाण्याचे पाळीतील अंतर दोन तीन दिवसांनी वाढवत जावे. त्यामुळे पिकाची पाण्याचा ताण सहन करण्याची नैसर्गिक क्षमता वाढते. पिकाची मुळे अधिक खोलवर जाऊन खालच्या थरातील उपलब्ध पाण्याचा वापर करतात. जमिनीतील उपलब्ध पाण्याचे प्रमाण ५० टक्क्यांच्या आसपास घटेल तेव्हाच पाणी द्यावे. पालाश खताची मात्रा (६० किलो प्रति हेक्टर) लागणीच्या वेळी जमिनीतून द्यावी.

लागण करताना बेणे म्युरेट ऑफ पोटॅशचे २ टक्के द्रावण किंवा ४ टक्के मॅग्नेशिअम सल्फेट किंवा ४ टक्के (हिराकस) फेरस सल्फेट मध्ये पाच मिनिट बुडवून त्यानंतर लागण करावी. युरिया २ टक्के (२० ग्रॅम प्रति लिटर पाणी), म्युरेट ऑफ पोटॅश २ टक्के (२० ग्रॅम प्रति लिटर पाणी) या प्रमाणात संयुक्त द्रावणाची फवारणी पिकावर लागणीनंतर ६०, १२० व १८० दिवसांनी करावी. लागणीचे बेणे शिळे झाल्यास चुनखडीचे पूर्ण विद्राव्य स्वरूपातील २ टक्के द्रावण तयार करून त्यात बेणे २ तास बुडवून नंतर लागण करावी.

पाचट सरीत पसरून त्यावर प्रतिटन पाचटासाठी ८ किलो युरिया, १० किलो सुपर फॉस्फेट आणि १ लिटर पाचट कुजवणाऱ्या जिवाणूचा वापर करावा. पाण्याच्या दोन पाळ्यांतील अंतर २० दिवसांपेक्षा जास्त वाढणार नाही याची दक्षता घ्यावी. वाऱ्यापासून संरक्षण म्हणून शेताच्या पश्चिमेस व उत्तरेस शेवरी लावावी, त्यामुळे बाष्पीभवनाचा वेग नियंत्रित होतो.सेंद्रिय खताचा वापर करून जमिनीमध्ये सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढवावे. सेंद्रिय कर्बामुळे जमिनीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता वाढते. खोडव्यामध्ये पाचटाचे आच्छादन करावे, त्यावर एकरी ५० किलो युरिया, ८० किलो सिंगल सुपर फॉस्फेट आणि २ लिटर पाचट कुजवणाऱ्या जिवाणूंचा वापर करावा.

# नाथापुर-रंजेगाव-कवडगाव रोडची दुरावस्था

## गेल्या कित्येक वर्षांपासून साधी दुरुस्तीही नाही; संतप्त नागरिकांचा सवाल

वडवणी । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील बीड गेवराई माजलगाव व वडवणी या चार तालुक्याच्या सिमेवर असणारा नाथापुर रंजेगाव कवडगाव हा प्रमुख जिल्हा मार्ग असणारा रोड अत्यंत खराब झाला असुन नाथापुर ते रंजेगाव दरम्यानच्या रोडवर डांबरीकरण तर सोडाच साधी दुरुस्तीही करण्यात आली नाही गेवराई चे तत्कालीन कार्यसम्राट आमदार लक्ष्मण आण्णा पवार यांचेकडे अनेकदा रोडबाबत निवेदने दिली परंतु त्यांनी साधी दखलही घेतली नाही त्यामुळे हा रोड बेवारस बनला आहे हा रोड गेवराई मतदार संघात येत असल्याने आ.विजयराजे पंडित साहेब आता तुमची जबाबदारी आहे आणी जनतेने तुम्हाला फार मोठ्या मताधिक्याने निवडुन दिलेले असल्यामुळे या भागातील जनता तुमच्याकडे आशेने पहात आहेत या रोडची इतकी दुरावस्था झाली आहे कि या रोडवरून पायी चालणेही मुश्किल झाले आहे सा.बां खाते तर गेल्या कित्येक वर्षांपासून निद्रावस्थेत आहे त्यांना काहीही देणेघेणे नाही तरी आमदार महोदय आपणच याकडे लक्ष देउन हा रोड त्वरीत डांबरीकरण करण्यात यावा अशी मागणी

### वाळू वाहतुकिमुळेच रोडची वाट लागली

या भागातील रंजेगाव येथील सिंधफणा पात्रातुन आज पर्यंत अवैध वाळू उपसा होत होता वाळु वाहतुक करणारे हायवा टिप्पर या रोडवरून अहोरात्र चालत होते त्यामुळेच या रोडची वाट लागली परंतु बीडचे पो.अधिक्षक नवनीत कावत जिल्ह्यात रूजु झाल्यापासून ही अवैध वाळू वाहतूक कायमची बंद झाली आहे त्या हा रोड मजबुत करण्यासाठी कुठलीही अडचण नाही.

### आ.प्रकाशदादांनी हॉटमिक्स डांबरीकरण केले

माजलगाव मतदार संघाचे अभ्यासु आ.प्रकाशदादा सोळंके यांनी याच दरम्यानच्या रंजेगाव फाटा ते मोरेवाडी दरम्यानच्या रोडवर कोरोनाच्या काळात तब्बल एकदाच ७कि.मी.हाटमिक्स डांबरीकरण केले तो रोड आजही मजबुत आहे.

या भागातील जनतेकडून होत आहे.

याबाबत अधिक वृत्त असे कि बीड जिल्ह्यातील बीड कुर्ला कुक्कडगाव आडगाव नाथापुर रंजेगाव कवडगाव पिंपरखेड वडवणी चिखलबीड हा जिल्ह्यातील प्रमुख जिल्हा मार्ग आहे याचा क्र.१८असुन या रोडवर अद्याप ही कुणाचे ही लक्ष नाही याचं जिल्हा मार्गावर नाथापुर रंजेगाव कवडगाव दरम्यान रंजेगाव फाट्यापर्यंत(शिव)हा रोड सा.बां.विभाग गेवराई कडे येतो मात्र या दरम्यानच्या रोडची ईतकी दुरावस्था झाली आहे कि या रोडवरून पायी चालणेही मुश्किल झाले आहे परिणामी या भागातील बीड कवडगाव ही बससेवा गेल्या ५वर्षापासुन बंद पडलेली आहे हा रस्ता पक्का असणे गरजेचे आहे कारण याच रोडवरुन या भागातील जनतेला गेवराई शी संपर्क करण्यासाठी नाथापुर वाहेगाव आम्ला भेंडटाकळी जातेगाव फाटा मार्गे गेवराई शी संपर्क करता येतो याच रोडवरुन गेल्या ५वर्षापुर्वी धारूर आगाराने धारूर ते छत्रपती संभाजी नगर बस चालु केली होती मात्र नाथापुर ते रंजेगाव दरम्यानचा रोड ईतका खराब झाला आहे कि रोडच्या दोहो बाजुंनी वेड्या बाभळीचे साम्राज्य पसरले आहे तर रोडवर मोठमोठे खड्डे पडल्यामुळे ही बससेवा बंद पडली याबाबत या भागातील जनतेने तत्कालीन कार्यसम्राट आमदार लक्ष्मण आण्णा पवार यांना अनेकदा निवेदने दिली.

मात्र त्यांनी साधी दखलही घेतली नाही आ.विजयराजे पंडित साहेब ही गावे मतदार संघाच्या शेवटच्या टोकाला जरी येत असली तरी ती मतदार संघातच आहेत पिंपळादेवी सुर्डी ताडसोन्ना केसापुरी परभणी ही गावे ही शेवटच्या टोकाला आहेत मात्र या गावाला रोड टकाटक आहेत मग नाथापुर रंजेगाव रोड साठीच दुजा भाव का?असा सवाल या भागातील जनता करत आहे तरी आमदार महोदय आपणच याकडे लक्ष देऊन हा रोड कायम मजबुत करण्यासाठी नाथापुर ते कवडगाव हद्द हा सिमेंट रोड करण्यात यावा अशी मागणी होत आहे.

# सिरसमार्ग येथे उपोषणकर्त्यांचे जलत्याग

## शासनाने दखल न घेतल्याने करणार कठोर उपोषण

बीड। प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील सिरसमार्ग येथे विविध मागण्यांसाठी गेल्या पंधरा दिवसापासून शेतकरी उपोषणाला बसले आहेत. या उपोषणाची अद्यापही प्रशासनाने दखल न घेतल्याने सोमवारपासून शेतकरी जलत्याग करणार आहेत. यासंदर्भात शेतकऱ्यांनी पुन्हा एकदा जिल्हाधिकारी यांना निवेदनही दिले आहे.

सिंदफणा पट्ट्यात शेतीला बारमाही पाण्याची सोय नसल्याने व दर दोन-तीन वर्षांनी दुष्काळ पडत असल्याने शेती तोट्यात जाते. परिणामी सुपीक जमिनीचा हा भाग असतानाही शेतकऱ्यावर आत्महत्या करणे, स्थलांतर करणे व शेतकऱ्यांच्या मुलांवर बेरोजगारीची वेळ येते. हे दुष्टचक्र थांबविण्यासाठी जायकवाडी धरणाचे पाणी सिंदफणा नदीमध्ये सोडावे, सिंदफणा नदीवर साखळी बंधारे बांधावेत, मातोरी कोळगाव मादळमोही पाडळसिंगी गडी पाचेगाव या शिवारातून उपकाल्वा करावा यासह इतर मागण्यांसाठी गेल्या पंधरा दिवसापासून १४० गावातील व लोकलढा आंदोलनातील शेतकरी सिरसमार्ग येथे उपोषण करत आहेत. या उपोषणाची दखल अद्यापही जिल्हा प्रशासनाने घेतलेली नाही तसेच अर्थसंकल्पात नवीन योजनांसाठी एक रुपयाही निधी दिला नाही त्यामुळे उद्या सोमवार (दि.१७) पासून पाणी न पिता उपोषण करण्याचा पवित्रा शेतकऱ्यांनी घेतलेला आहे. भाऊसाहेब जरांगे पाटील, राजेसाहेब काका पवळ, समन्वयक दिनेश गुळवे, देविदास चव्हाण, महादेव रडे, गणेश जाधव, भास्कर खांडे पाटील, बाबुराव जेठे, शामराव घुगे, राजाभाऊ महाराज कुटे, गणेश हाडुळे, रामदास महाराज निर्मळ, दिपकराव जाधव, रामेश्वर गाडे, विजयकुमार करपे, हनुमान गायकवाड, बालासाहेब शेरकर, आदीनाथ जोगदंड, काशीनाथ जोगदंड पाटील, गहिनीनाथ पालवे, रामप्रभू गात, संतोष रडे, ज्ञानेश्वर तांबारे आदींसह या लोकलढा आंदोलनातील १४० गावातील शेतकरी यावेळी उपस्थित राहणार आहेत.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका जिल्ह्यातील सर्वोत्कृष्ट: उपशिक्षणाधिकारी सोनवणे

माजलगाव। प्रतिनिधी

शिक्षण हे वाघिणीचं दूध आहे,तो जो प्राशन करील तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. असं शिक्षणाचे महत्त्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले आहे.त्याच अनुषंगाने माजलगाव शहरातील पंचायत समिती जवळील जिल्हा परिषद हायस्कूल शाळेच्या परिसरात महा.राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाच्या प्रयत्नाने तसेच सर्व समाज घटकाच्या सहकार्याने डॉ.बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका उभारली जात आहे.ही अभ्यासिका बीड जिल्ह्यातील एक आदर्श अभ्यासिका असल्याचे प्रतिपादन उपशिक्षणाधिकारी भगवानराव सोनवणे यांनी व्यक्त केले.



गुरुवार दिनांक १३ रोजी सावित्रीबाई फुले विद्यालयाचे मुख्याध्यापक सचिन वाघमारे यांच्याकडून या अभ्यासिकेसाठी दहा खुर्च्या भेट देण्यात आल्या.याप्रसंगी उपशिक्षणाधिकारी भगवान सोनवणे बोलत होते.कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाचे तालुकाध्यक्ष राहुल टाकणखार व पदाधिकारी तसेच कर्मचारी, शिक्षणप्रेमी यांच्या पुढाकाराने ही अभ्यासिका या ठिकाणी मोठ्या दिमाखात उभारली जात आहे.ही अभ्यासिका उभारण्यासाठी अनेक समाज घटकातील शिक्षणप्रेमी पुढे येत आहेत आणि अभ्यासिका उभारणी कामी सहकार्य करत आहेत ही अतिशय उल्लेखनीय बाब आहे. माजलगाव शहरातील होतकरू आणि गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी ही अभ्यासिका लाभदायक ठरणार आहे.शिक्षण हे समाजातील तळागाळातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचले पाहिजे हा उद्देश ठेवून या अभ्यासिकेची निर्मिती करण्यात येत आहे.सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना महागड्या अभ्यासिका लावण्याऐवजी या अभ्यासिकेचा नक्कीच फायदा, उपयोग होणार आहे. यावेळी माजलगावचे गटशिक्षणाधिकारी रवींद्र महामुनी,गेवराईचे मा.गटशिक्षणाधिकारी मिलिंद तुरुकमारे,कादेसर,केंद्रप्रमुख शिवाजी बलशेठवार,साधन व्यक्ती लक्ष्मण पोटभरे,रवी आदमाने,जिजाऊ शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन विलास शेजुळ,मराठा सेवा संघाचे अध्यक्ष उत्तम पवार,निवेदक कवी अशोक वाडेकर,प्रभाकर साळवे,राजाभाऊ वाघमारे,सुमंत राऊत,गौतम घनघाव, रमेश जाधव, खळगे सर,लोखंडे सर यांची उपस्थिती होती. डॉ बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका निर्माणाधीन आहे. तेव्हा या अभ्यासिकेचा लाभ सर्व विद्यार्थ्यांनी घ्यावा.असे आवाहन या अभ्यासिकेचे प्रमुख राहुल टाकणखार यांनी केले आहे.

# महिला दिनानिमित्त अभियांत्रिकी महाविद्यालयात व्याख्यान

अंबाजोगाई। प्रतिनिधी

शहरातील अभियांत्रिकी महाविद्यालयात महिला दिनाचे औचित्य साधून आय.एम.ए अंबाजोगाई व रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने अंबाजोगाई येथील प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ .नवनाथ घुगे , तसेच डॉ अरुणा केंद्रे व डॉ अर्चना थोरात यांचे ' बदलती जीवनशैली व महिलांचे आरोग्य ' या विषयावर व्याख्यान संपन्न झाले.

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने दरवर्षी आय.एम.ए. अंबाजोगाई व रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी हे नवनवीन पण महिला हिताचे उपक्रम राबवत असतात. ज्यामुळे महिला भगिनींना समाजात जे सर्वोच्च स्थान आहे ते अबाधित राहिले पाहिजे यासाठी सातत्याने प्रयत्न राहिला आहे.त्याच निमित्ताने महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था लातूर संचलित अभियांत्रिकी महाविद्यालय अंबाजोगाई येथे महिला दिनाच्या निमित्ताने महिला भगिनींसाठी प्रसिद्ध असे हृदयरोग तज्ञ डॉ.नवनाथ घुगे तसेच डॉ अर्चना थोरात, डॉ अरुणा केंद्रे ' यांचे बदलती जीवनशैली व महिलांचे आरोग्य ' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. यावेळी आय.एम.ए. अंबाजोगाईच्या वुमन्स विंगच्या



अध्यक्षा डॉ. अरुणाताई केंद्रे, प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉ.अर्चनाताई थोरात आय.एम.ए अंबाजोगाईचे सचिव डॉ.सचिन पोतदार,अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रावबावळे सर, प्रा.डॉ.राजमाने सर, श्रीमती मंजुषा जोशी, प्रा. रोहिणी पाठक व इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी विस्तृत अशा व्याख्यानात डॉ.नवनाथ घुगे यांनी वेगवेगळ्या विषयांना स्पर्श केला. समाज जीवनातील वातावरणात महिलांना कशा पद्धतीने वेगवेगळ्या प्रसंगांना व वातावरणाला सामोरे जावे लागते त्यामुळे महिलांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होतो. सामाजिक वातावरण असो की, कौटुंबिक वातावरण असो या ठिकाणी प्रमुख पटलावर महिलाच असतात म्हणून त्यातून तणाव निर्माण होतो आणि वेगवेगळे आजार उद्भवतात. शिवाय महिला भगिनींनी आहारावर अधिक लक्ष देणे गरजेचे आहे ज्याचा परिणाम आरोग्यावर होतो. अनावश्यक चरबी वाढते आणि आजार उद्भवतात. महिलांनी अन्न सेवन केल्यानंतर त्यासाठी नियमित व्यायाम केला पाहिजे. यावेळी डॉ. घुगे यांनी व्यसनामुळे होणारे दुष्परिणाम, वाढलेले वजन व दुष्परिणाम, योगा व प्राणायाम याचे महत्त्व आणि बदलत्या जीवनशैलीबद्दल विस्तृत असे मार्गदर्शन करून महिला भगिनींच्या अनेक प्रश्नांची उकल करून दिली.यावेळी डॉ.अरुणाताई केंद्रे,डॉ अर्चनाताई थोरात यांनी सुद्धा स्तानाचा, गर्भाषयाचा कर्करोग व महिला भगिनींच्या इतर आजारासंबंधी मार्गदर्शन केले.या कार्यक्रमास अभियांत्रिकी महाविद्यालयातील जवळपास ५०० विद्यार्थिनी उपस्थित होत्या. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आय एम.ए.अंबाजोगाई व रोटरी क्लबचे अध्यक्ष कल्याण काळे, सचिव धनराज सोळंकी व इतर सदस्यांनी परिश्रम घेतले.या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# अंबाजोगाईत महिला मॅरेथॉन

## युवती,महिलांचा मोठा प्रतिसाद

अंबाजोगाई। प्रतिनिधी

येथील रोटरी क्लब,इनरव्हील क्लब,रोटरॅक्ट क्लब आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले महिला पतसंस्थेच्या संयुक्त विद्यमाने रविवारी सकाळी आयोजित केलेल्या महिला मिनी मॅरेथॉन स्पर्धेला महिलांचा मोठा प्रतिसाद मिळाला राष्ट्रीय खेळाडू व नायब तहसीलदार स्मिता बाहेती , क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले पतसंस्थेच्या अध्यक्षा सुनिता मोदी,डॉ . सुलभा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत छत्रपती शिवाजी चौकात मिनी मॅरेथॉनला प्रारंभ करण्यात आला . संत भगवानबाबा चौकात विजेत्या खेळाडूंना मान्यवरांच्या हस्ते बक्षिस वितरण करण्यात आले .

पाचवी ते दहावी गटात प्रणिता माने प्रथम,सोनल भिवगुडे द्वितीय ,अंजली केंद्रे तृतीय व अनुष्का करंडेला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले . आठरा ते पंचेवीस वयोगटात वैष्णवी गडदे प्रथम,सुप्रिया चिरके द्वितीय ,तनुजा देशमुख तृतीय व वैष्णवी कोल्हापूरे उत्तेजनार्थ बक्षिस



देण्यात आले .सव्वीस ते एकोणपन्नास वयोगटात डॉ प्रिया तिडके प्रथम, सीमा उणवणे द्वितीय, सारिका नायबळ तृतीय व ललीला मगर यांना उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.पन्नास ते सत्तर वयोगटात सविता पाटील प्रथम,उषा यादव द्वितीय ,कल्पना लोहिया तृतीय व अनिता शेटकार यांना उत्तेजनार्थ बक्षिस देण्यात आले.स्पर्धेसाठी पंच म्हणून शिवकुमार निर्मळे , दत्ता देवकते , मनेश गोरे यांनी काम पाहिले.रोटरी, रोटरॅक्ट, इनरव्हिल, सावित्रीबाई फुले पतसंस्था पदाधिकारी यांच्या इतरांनी सहकार्य केले .

# ६ वर्षाच्या हसनेन नविद जाफरीने ठेवला पहिला रोजा

अंबाजोगाई। प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील सामाजिक कार्यकर्ते खलील जाफरी यांचे चिरंजीव हसनेन नविद जाफरी या केवळ ६ वर्षीय चिमुकल्याने आपल्या आयुष्यातील पहिला रोजा पूर्ण केला. सध्या मुस्लिम समाजाचा पवित्र रमजान महिना सुरू असुन दिवसेंदिवस उन्हाची तिव्रता वाढत असल्याने रखरखत्या वातावरणातही मुस्लिम समाजातील नागरिक रोजा (उपवास) ठेवून आपल्या ईश्वरा प्रति (अल्लाह कडे) कृतज्ञता व्यक्त करत आहेत. आपल्या आई वडील तसेच इतर नातेवाईक यांचे अनुकरण करून घरातील चिमुकलेही रोजा धरत असतांना दिसून येत आहेत.अंबाजोगाई शहरातील सामाजिक कार्यकर्ते तथा समाजसेवक खलील जाफरी यांच्या ६ वर्षीय मुलगा हसनेन नविद




जाफरी याने आपल्या आयुष्यायील पहिला वाहिला रोजा (उपवास) पूर्ण केला. हसनेनच्या पहिल्या रोजाबद्दल त्याचे परिसरातील संपूर्ण जेष्ठ नागरिक, मित्र परिवार तसेच नातेवाईकानी शुभेच्छा दिल्या आहेत.

# अष्टावरणामुळे जीवनाला पूर्णत्व प्राप्त होते-चन्नबसव शिवाचार्य

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अष्टावरण हा लिंगायत धर्मातील एक महत्त्वाचा आणि मूलभूत संकल्पना आहे. अष्टावरण म्हणजे आठ आवरणं. ती म्हणजे गुरु, लिंग, जंगम, पादोदक, तीर्थ, प्रसादमंत्र, भस्म आणि रुद्राक्ष. या आठ आवरणांनीच मानवाच्या जीवनाला पूर्णत्व प्राप्त होते, असे प्रतिपादन अंबाजोगाई तालुक्यातील बर्दापूर येथील संस्थान श्री गुरु महालिंग स्वामी मठ, बर्दापूर चे मठाधिपती ष.ब्र.१०८ श्री गुरु चन्नबसव शिवाचार्य महाराज यांनी आपल्या तेराव्या पट्टाभिषेक दिनानिमित्त आयोजित केलेल्या अखंड शिवनाम सप्ताह व परमरहस्य पारायण सोहळ्यात आशिर्वचना वेळी धर्मसभेत उपस्थित भाविक भक्त व शिष्यांना केले.यावेळी शिखर शिंगणापूर येथील सिद्धलिंग शिवाचार्य महाराज , ष.ब्र.काशिनाथ शिवाचार्य महाराज यांची प्रमुख उपस्थिती होती.



अष्टावरणाचे पालन केल्याने समाजात समानता, प्रेम आणि सद्भाव वाढतो. या आठ आवरणांमुळे व्यक्तीच्या जीवनात सकारात्मक बदल होतात आणि तो एक चांगला नागरिक बनतो.आजच्या धकाधकीच्या जीवनात अष्टावरणाचे महत्त्व अधिक वाढले आहे. यामुळे व्यक्तीला मानसिक शांती मिळते. अष्टावरणाचे पालन केल्याने व्यक्तीला जीवनातील अडचणींना सामोरे जाण्याची शक्ती मिळते.अष्टावरण हा लिंगायत धर्माचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. या संकल्पनेमुळे व्यक्ती आणि समाजाचा विकास होतो.असे श्री गुरु चन्नबसव शिवाचार्य महाराज यांनी सांगितले.कार्यक्रमास बर्दापूर व पंचक्रोशीतील महिला , पुरुष भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रेवण हिरेमठ यांनी करून उपस्थितांचे आभार व्यक्त केले. विक्रम विश्वनाथ बिडवे दांपत्याने श्री गुरु चन्नबसव शिवाचार्य महाराजांची साखर तुला केली. आठही दिवस महीला भक्तांनी परमरहस्य पारायण केले.तसेच मठामध्ये कीर्तन आयोजित करण्यात आले. दररोज सर्वांसाठी महाप्रसादाची सोय करण्यात आली होती. सप्ताहाच्या शेवटच्या दिवशी श्री गुरु चन्नबसव शिवाचार्य महाराज यांची रथामधून वाजत गाजत व टाळ मृदंगाच्या गजरात भव्य मिरवणूक काढण्यात आली. बालाजी बागल,शिवशंकर बिडवे,निळकंठ पाटील,मन्मथ आकुसकर,युवराज पाटील,शिवराज चिल्लरगे,सचिन चिल्लरगे यांनी यशस्वीतेसाठी पुढाकार घेतला.

# रिझर्व्ह बँकेकडून अंबाजोगाई पिपल्स बँकेस नवीन तीन शाखांना परवानगी

अंबाजोगाई। प्रतिनिधी

अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेस रिझर्व्ह बँकेच्या वतीने नवीन तीन शाखा कार्यान्वित करण्यास परवानगी दिल्याचे पत्र नुकतेच रिझर्व्ह बँकेकडून अंबाजोगाई पिपल्स बँकेस प्राप्त झाल्याची माहिती बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी, उपाध्यक्ष प्रकाश सोळंकी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी धनंजय देशपांडे यांनी दिली आहे. यावेळी बँकेचे संचालक प्रा वसंत चव्हाण,ॲड विष्णूपंत सोळंके, अरुण काळे, पुरुषोत्तम चोकडा, सुरेश मोदी, ॲड सुधाकर कऱ्हाड, संकेत मोदी, शेख दगडू भाई दावल, सुधाकर विडेकर, प्रकाश लखेरा, हर्षवर्धन वडमारे , प्रा वनमाला रेड्डी,सौ स्नेहा हिवरेकर, लक्ष्मण दासूद, सचिन बेंबडे हे उपस्थित होते. १९९६ साली अंबाजोगाई शहरातील व्यापारी तथा नागरिकांची निकड लक्षात घेऊनन अल्पशा भांडवलावर अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेची स्थापना करण्यात आली होती. आज जवळपास सत्तावीस अठ्ठावीस वर्षात बँक ५३७ कोटीच्या ठेवी १९ कोटींच्या भांडवलावर २० शाखांच्या माध्यमातून ग्राहकांना सेवा देत असल्याचे राजकिशोर मोदी यांनी सांगितले.

सप्टेंबर २०२४ अखेर बँकेचे वसूल भागभांडवल हे रू १८ कोटी आहे. बँकेचा स्वनिधी हा रुपये ४७ कोटी आहे. राखीव निधी हा १४ कोटी लाख रुपये एवढा आहे. बँकेने रिझर्व्ह बँकेच्या नियमास आधीन राहून ग्राहकांना रु.३२८ कोटी एवढा कर्ज पुरवठा केला असल्याचे बँकेचे अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी सांगितले. सप्टेंबर २०२४ अखेर बँकेची एकूण गुंतवणूक रु २४३ कोटी एवढी आहे. मागील वर्ष अखेरीस बँकेस करपसच्यात ४ कोटी २० लाखांचा नफा होऊन ०% एन पी ए मिळवला असून लेखा परीक्षण अहवालात प्रतिवर्षी बँकेस ''अ'' दर्जा प्राप्त होत आहे. बँकेची ही उंच भरारी पाहता बँकेचे सर्व संचालक मंडळ, अधिकारी व कर्मचारी वृंद तसेच कर्जदार , ठेवीदार व सभासद यांच्या सांघिक कामगिरीमुळे बँकेस हे प्रगतीचे उद्दीष्ट साध्य करता आले असल्याचे मोदी यांनी नमूद केले.

अंबाजोगाई पिपल्स बँक ही आज वीस शाखांच्या द्वारे ग्राहकांना सेवा पुरवीत आहे . नुकत्याच आणखी दोन नवीन शाखां रिझर्व्ह बँकेच्या मान्यतेनुसार अंबाजोगाई (चौसाळकर कॉलनी) व छत्रपती संभाजी नगर (सातारा परिसर) येथे सुरू केल्या आहेत. यापुढे पुणे (पिंपरी चिंचवड) व मुंबई याठिकाणी सुद्धा बँकेच्या शाखा सुरू करण्याचा मानस असल्याचे राजकिशोर मोदी यांनी सांगितले. बँकेने क्षेत्रात देखील ग्राहकांना तात्काळ सेवा उपलब्ध होण्यासाठी भरीव अशी कामगिरी केली आहे. डिजिटल बँकिंग च्या माध्यमातून , , , द्वारे ग्राहकांना उत्तम सेवा देण्यासाठी बँक सदैव प्रयत्नशील असल्याने मोदी यांनी यावेळी नमूद केले. बँकेची प्रगती ही बँकेच्या पुढील वाटचालीस नवीन उभारी देणारी असून बँकेच्या सभासदांनी व ग्राहकांनी बँकेवरील विश्वास कायम ठेवल्याची ही पावतीच असल्याचे राजकिशोर मोदी यांनी स्पष्ट केले. मागील काळात अनेक आर्थिक संस्था डबघाईला येऊन दिवाळखोरी मध्ये निघाल्या. अनेक ठेवीदारांना याचा मोठ्या प्रमाणावर फटका सहन करावा लागला. मात्र अशाही परिस्थितीत अंबाजोगाई पिपल्स बँक ग्राहक ठेवीदार व सभासदांच्या विश्वासाच्या बळावर ताठ मानेने आपला डोलारा पुढे नेत असल्याचा अभिमान संस्थापक राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केला. कोरोना विषाणू संसर्गाच्या पार्श्वभुमीवर देखील कर्जधारक ग्राहकांचा विचार करुन बँकेची आर्थिक स्थिती समाधानकारक ठेवण्यास यश मिळवले. बँकेचे माननिय सभासद, ग्राहक यांचा विश्वास, बँकेचे संचालक मंडळ तसेच बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे उत्कृष्ट नियोजन व बँकेच्या अधिकारी व कर्मचारी वृंदाचे नियोजनबध्द कामकाज यामुळे बँक दिवसेंदिवस वृद्धिंगत होत असल्याचे दिसून येत असल्याचे राजकिशोर मोदी यांनी यावेळी नमूद केले.

अंबाजोगाई पिपल्स बँक केवळ अर्थकारणच न करता वेळोवेळी अनेक समाजोपयोगी कार्यक्रम राबविले असते. ज्यामध्ये शहरातील गुणिजनांचा सन्मान , रक्तदान शिबीर , कोरोना योध्दा सन्मान, बँकिंग क्षेत्रात महिला जनजागृती अशा विविध सामाजिक उपक्रमांच्या यशस्वी आयोजनामुळे व ग्राहकांसाठीच्या नवनवीन उपक्रमामुळे बँक ग्राहकांच्या प्रथम पसंतीस उतरली आहे. यापुढेही अर्थकारणासोबतच वारंवार असेच सामाजिक , शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रम राबविण्यात येतील असा संकल्प राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केला .

# घाटनांदुर येथे सुभेदार मल्हारराव होळकर यांची जयंती साजरी



घाटनांदुर। प्रतिनिधी

येथे श्रीमंत सुभेदार मल्हारराव होळकर यांच्या जयंतीनिमित १६ मार्च रोजी सकाळी ९ वाजता सुभेदार मल्हारराव होळकर चौक येथे प्रतिमेचे पूजन करून व श्रीफळ फोडून अभिवादन करण्यात आले. यावेळी मल्हार प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रदीप भैय्या वैद्य, सरपंच महेश गारटे, दत्ता जाधव, बाळासाहेब देशमुख, गोविंद वैद्य, रामभाऊ वैद्य,राम वालेकर , पत्रकार संजय रानभरे ,संतोष गाडवे, दादा वैद्य, उत्सव जाधव, मुकिंद वैद्य,हनुमंत निळे,दत्ता सोनटक्के, बालाजी मिसाळ,परमेश्वर गाडवे , अशोक वैद्य ,रोहन गाडवे,कार्तिक वैद्य,राम शिंदे,किशोर वैद्य, ज्ञानेश्वर वैद्य व सर्व मल्हार प्रतिष्ठानचे सदस्य व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते

# पाटोदा येथील आम सभा कार्यकर्त्यांची होती की सामान्य जनतेची!

**पाटोदा । प्रतिनिधी**

**सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी रविवार दिनांक १६ तीन २०२५ रोजी सुरेश यांच्या.अध्यक्षतेखाली पाटोदा येथील पंचायत समिती येथे आम सभा संपन्न झाली. प्रसंगी उपस्थित सर्वांची आपुलकीचा संवाद साधत माय बाप जनतेचे प्रश्न समजून घेत प्रशासनाकडून होत असलेल्या दिरंगाईबाबत सविस्तर आढावा घेतला. तसेच उपस्थित अधिकाऱ्यांना या समस्या सोडवण्याबाबत योग्य धोरण राबवण्याच्या सूचना आ.सुरेश धस यांनी केल्या. शिवाय काही प्रश्न तात्काळ मार्गी लावले.**



(१) विशेष म्हणजे सात वर्षांनी आम सभा पाटोदा संपन्न झाली.

(२) आम सभेमध्ये सामान्य जनतेचे घराणे ऐकण्यापेक्षा कार्यकर्त्यांनी भाषणे जास्त ठोकले. सभा कमी आणि कार्यकर्त्याची भाषणे जास्त झाली. आम सभा संपल्यावर.लोकात चर्चा रंगली..

३*सर्वसामान्य पेक्षा जे बंगल्यावर सतत जातात असेच लोक प्रश्न विचारत होते असं दिसलं सामान्याला आपलं मत मांडायचे संधी मिळाले नाही... या आमसभेतून कृषी विभागासंदर्भात, घरकूला संदर्भात, सरकारी कार्यालयाच्या विविध विभागा संदर्भात जनतेचे प्रश्न निदर्शनास आले. तसेच पंचायत समितीमधील मंजूर कामे केवळ कागदावर असून काही कामे रखडवण्यात आली आहेत. सरकारी कार्यालयातील विविध अधिकाऱ्यांबाबत ग्रामस्थांचा तक्रारी आयकून घेतल्या आहेत. सर्वसामान्य जनतेची कामे न रखडवता ती त्वरित मार्गी लावण्याच्या सूचना उपस्थित वर्गाला या आम सभेतून दिल्या.

याशिवाय सरकारी योजना या समाजातील प्रत्येक घटकासाठी आहेत. या योजनांचा लाभ प्रत्येकाला झाला पाहिजे असे मत उपस्थित्तांशी बोलताना व्यक्त केले. शेतकऱ्यांसाठी शेत तलावाच्या दुरुस्तीचे आदेश यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना दिले असून दिव्यांग बांधवांना देखील त्यांच्या प्रलंबित निधी लवकरच मिळणार आहे. यावेळी आ.धस म्हणाले यावेळी उपस्थितांशी बोलताना पुढच्या वर्षापासून प्रत्येक गावांसाठी स्वतंत्र आम सभा घेणार असल्याचे धस यांनी स्पष्ट केले. यामध्ये सर्वांचे प्रश्न ऐकून घेऊन ते सोडवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणार आहे असे आ.सुरेश धस म्हणाले . यावेळी उपविभागीय अधिकारी श्रीमती वसीमा शेख मॅडम, तहसीलदार श्री. निलावड साहेब, पोलीस निरीक्षक श्री. जाधव साहेब, नगराध्यक्ष दिपालीताई जाधव, गटविकास अधिकारी श्री. वानखेडे साहेब, गटशिक्षणाधिकारी श्री. बोदार्डे साहेब यांच्यासह महावितरणचे उपाभियंता श्री. सावकारे साहेब, भूमी अभिलेखचे श्री. गायकवाड साहेब, रजिस्टर कार्यालयाचे श्री. पाटील साहेब, जिल्हा परिषद अंतर्गत येणाऱ्या सर्व कक्षाचे प्रमुख अभियंता उपअभियंता, महसूल विभाग अंतर्गत असणारे मंडळ अधिकारी तलाठी व त्यांच्या समवेत काम करणारे सर्व यंत्रणांचे प्रमुख अधिकारी व कर्मचारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिशान मुस्तफा सय्यद चिमुकल्यांचा पहिला रोजा पूर्ण

**पाटोदा । प्रतिनिधी**

मुस्लिम धर्माच्या पवित्र रमजान महिन्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. या महिन्यात मुस्लिम समाजातील लहान चिमुकल्यांना वगळून इतर सर्वांना रोजा (फर्ज) सक्तीचे असतात. परंतु घरात पालकांचे पाहून हे लहान चिमुकले ही मोठ्यांचे अनुकरण करीत रोजा धरतात. अश्याच प्रकारे



पाटोदा येथील प्रसिद्ध विश्वास डेव्हलपर्स चे संचालक सय्यद मुस्तफा यांचा लाडका चिमुकला जिशान सय्यद (वय ८ वर्षे) याने त्याच्या आयुष्यातील पहिला रोजा काटेकोरपणे पुर्ण केला आहे. दिवससभर अन्नाचा कण व पाण्याचा एक थेंबही न घेता काटेकोरपणे आपल्या आयुष्यातील पहिला रोजा यशस्वी पुर्ण केल्याबद्दल त्यांच्या कुटुंबाच्या वतीने व नाना,नानी, दादा, दादी, मामा, मामी,आत्या व सर्व सय्यद व मित्र परिवार कडुन जिशानचे कौतुक व अभिनंदन केले आहे.

# माजलगावात राजे मल्हारराव होळकर यांची जयंती साजरी

**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरातील राजे मल्हारराव होळकर चौक येथे दि.१६ मार्च रविवार रोजी सकाळी १०:०० वाजता महापराक्रमी, विलक्षण कर्तृत्ववान,मल्हार तंत्राचे जनक व शून्यातून विशाल होळकर साम्राज्य स्थापून मराठा साम्राज्याची पताका अटकेपार फडकवत दिल्लीवर अंकुश ठेवणारे शूरवीर श्रीमंत सुभेदार मल्हारराव होळकर यांच्या जयंतीनिमित्त पावन स्मृतीस अभिवादन करताना.वृंदावन धामचे आकाश महाराज शास्त्री, शिवसेना तालुका प्रमुख तुकाराम येवले,माजी नगराध्यक्ष डॉ.अशोकराव तिडके,भाजपा तालुकाध्यक्ष अरुणराव राऊत, धनगर समाजाचे नेते बबनराव



सरवदे,ओबीसी नेते लक्ष्मणराव गायकवाड,माजी जि.प.सदस्य प्रा. प्रकाश गवते, अंकुशराव गांडगे, मल्हार सेनेचे अशोक डोणे, प्रा.लक्ष्मीकांत सोन्नर,युवा नेते रोहित वगरे,धनगर समाजाचे नेते अविनाश कांडुरे, युवा मल्हार सेनेचे तालुकाध्यक्ष संतोष देवकते,ओबीसी महासंघाचे तालुकाध्यक्ष शामसुंदर पांचाळ, युवा नेते नारायण मेंडके,रासपचे तालुकाध्यक्ष मुक्तीराम आबुज, सेवानिवृत्त गटविकास अधिकारी सुभाषराव गडदे, मार्तंड पतसंस्थेचे चेअरमन विशाल देवकते,माजी नगरसेवक शरद यादव,लोकनेते सुंदरराव सोळंके कारखान्याचे सचिव सुरेशराव लगड, अशोकराव पाटील, भागवतराव गायकवाड,

# कुंडलिका व सीना नदीवरील अतिक्रमणबाबत पोलीस बंदोबस्तात कारवाई

जालना । प्रतिनिधी

खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या आक्रमक भूमिकेमुळे प्रशासनाने जलद हालचाल करत जालना शहरातून वाहणाऱ्या कुंडलिका व सीना नद्यांच्या अतिक्रमण मुक्तीसाठी आणि सीमारेषा निश्चित करण्यासाठी महत्त्वपूर्ण बैठक आयोजित केली असून, बुधवारी ही बैठक होईल आणि त्यानंतर नदीपात्रातील अडथळे दूर करण्याची धडक कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे.

शहरातील रामतीर्थ येथे गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या उपोषणाला सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून, कुंडलिका सीना फाऊंडेशन, समस्त महाजन संस्था व विविध सामाजिक कार्यकर्त्यांच्या पाठपुराव्यामुळे नद्यांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी ठोस पावले उचलण्यात येणार आहेत. खासदार डॉ. कल्याण काळे यांनी या उपोषणाला आज रविवार दि. १६ मार्च रोजी भेट देऊन, उपोषणकर्त्यांचे म्हणणे जाणून घेतले.




उपोषणकर्त्यांनी सांगितले की, जालना शहर आणि जवळपास २५ गावांच्या पाणलोटातून प्रवाहित होणाऱ्या कुंडलिका व सीना नद्या पाणलोटातील संत गाडगेबाबा घाणेवाडी तलाव, मोती तलाव, जामवाडी तलाव यासह अनेक लहानमोठ जलस्त्रोत पुनरूज्जीवीत व्हावेत म्हणून सातत्यपूर्ण प्रयत्न सुरू आहेत. कुंडलिका सीना फाऊंडेशन आणि मुंबई येथील समस्त महाजन संस्था यांच्यासह विविध सामाजिक संस्था मागील काही वर्षांपासून व्यापक लोकसहभाग उभा करत काम करत आहेत. पाणलोटासह शहरी भागातील नद्यांची सीमा पुररेषा निश्चित व्हावी. यादरम्यान येणारी सर्व अतिक्रमणे काढण्यात यावी यासाठी मागील दोन दिवसांपासून रामतिर्थ येथे उपोषण सुरू आहे. शहरी भागात सीना नदीपात्रात एक रस्ता अनधिकृतपणे बनविण्यात आलेला होता. वेळोवेळी आंदोलने निदर्शने करत विभागीय आयुक्तांसह सगळीकडेच विनवणी करणे सुरू होते. रस्ता अनधिकृत असल्याचे सांगूनही तो काढण्यासाठी प्रशासनाकडून टाळाटाळ सुरू होती. जिल्हाधिकारी यांनी आश्वासन देऊनही प्रत्यक्ष काम होत नव्हते, असे त्यांच्या निदर्शनास आणून दिले असता, डॉ. काळे यांनी तातडीनेमहानगरपालिका आयुक्त संतोष खांडेकर यांना उपोषणस्थळी बोलावून घेतले. संबंधित अधिकारी व पोलिस प्रशासन यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत, सीना नदीपात्रातील अनधिकृत रस्ता हटवण्याचे तसेच नदीसीमा व पुररेषा निश्चित करण्याचे आदेश देण्यात आले. खा. डॉ. कल्याण काळे यांनी रजेवर असलेले जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्याशी फोनवर थेट संवाद साधत तातडीने कारवाई करण्याचे निर्देश दिले. महानगरपालिकेने दोन्ही नद्यांवर प्रत्येकी एक याप्रमाणे दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती करून नदीसीमा निश्चित करण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांनी सोपवली आहे. बुधवारपासून प्रत्यक्ष अतिक्रमण हटवण्याचे काम

# शिक्षक क्षमतावृद्धी प्रशिक्षणार्थींना कुरआनचे मोफत वाटप



**वडवणी । प्रतिनिधी**

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अंबाजोगाई जिल्हा बीड आयोजित तालुकास्तरीय पाच दिवशी टप्पा क्रमांक ४ प्राथमिक / माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक क्षमतावृद्धी प्रशिक्षण सन २०२४-२०२५ करिता दिनांक १० मार्च २०२५ ते १५ मार्च २०२५ या कालावधीत अलहुदा उर्दू हायस्कूल शहेनशहा नगर बीड येथे संपन्न झाले. या प्रशिक्षणाच्या समारोपाच्या दिवशी फलाह-ए-आम ट्रस्ट,महाराष्ट्र बीड येथील,अलहुदा उर्दू हायस्कूलच्या वतीने इस्लाम धर्मियांचा पवित्र समजला जाणारा रमजान महिन्याचे औचित्य साधून इस्लाम धर्माचा पवित्र धर्मग्रंथ कुरआन ज्याला प्रत्यक्ष परमेश्वराचा अल्लाचा शब्द मानतात अल्लाहने त्यांचा प्रेषित मोहम्मद पैगंबरा मार्फत हा मानव जातीच्या कल्याणासाठी संदेश दिला आहे त्यात प्रामाणिकपणा,न्याय,दया आणि करुणा यासारख्या नैतिक मूल्यांचा मार्गदर्शन ६२३६ श्लोकातून केले आहे याची माहिती सर्वांना व्हावी म्हणून मराठी

# अभियांत्रिकी महाविद्यालयात बदलती जीवनशैली व महिलांचे आरोग्य यावर व्याख्यान

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**


शहरातील अभियांत्रिकी महाविद्यालयात महिला दिनाचे औचित्य साधून आय.एम.ए अंबाजोगाई व रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने अंबाजोगाई येथील प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ .नवनाथ घुगे , तसेच डॉ अरुणा केंद्रे व डॉ अर्चना थोरात यांचे बदलती जीवनशैली व महिलांचे आरोग्य ' या विषयावर व्याख्यान संपन्न झाले.

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने दरवर्षी आय.एम.ए. अंबाजोगाई व रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी हे नवनवीन पण महिला हिताचे उपक्रम राबवत असतात. ज्यामुळे महिला भगिनींना समाजात जे सर्वोच्च स्थान आहे ते अबाधित राहिले पाहिजे यासाठी सातत्याने प्रयत्न राहिला आहे.त्याच निमित्ताने महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था लातूर संचलित अभियांत्रिकी महाविद्यालय अंबाजोगाई येथे महिला दिनाच्या निमित्ताने महिला भगिनींसाठी प्रसिद्ध असे हृदयरोग तज्ञ डॉ.नवनाथ घुगे तसेच डॉ अर्चना थोरात, डॉ अरुणा केंद्रे यांचे बदलती जीवनशैली व महिलांचे



आरोग्य या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. यावेळी आय.एम.ए. अंबाजोगाईच्या वुमन्स विंगच्या अध्यक्षा डॉ. अरुणाताई केंद्रे, प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉ.अर्चनाताई थोरात आय.एम.ए अंबाजोगाईचे सचिव डॉ.सचिन पोतदार,अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रावबावळे सर, प्रा.डॉ.राजमाने सर, श्रीमती मंजुषा जोशी, प्रा. रोहिणी पाठक व इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी विस्तृत अशा व्याख्यानात डॉ.नवनाथ घुगे यांनी वेगवेगळ्या विषयांना स्पर्श केला. समाज जीवनातील वातावरणात महिलांना कशा पद्धतीने वेगवेगळ्या प्रसंगांना व वातावरणाला सामोरे जावे लागते त्यामुळे महिलांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होतो. सामाजिक वातावरण असो की, कौटुंबिक वातावरण असो या ठिकाणी प्रमुख पटलावर महिलाच असतात म्हणून त्यातून तणाव निर्माण होतो आणि वेगवेगळे आजार उद्भवतात. शिवाय महिला भगिनींनी आहारावर अधिक लक्ष देणे गरजेचे आहे ज्याचा परिणाम आरोग्यावर होतो. अनावश्यक चरबी वाढते आणि आजार उद्भवतात. महिलांनी अन्न सेवन केल्यानंतर त्यासाठी नियमित व्यायाम केला पाहिजे. यावेळी डॉ. घुगे यांनी व्यसनामुळे होणारे दुष्परिणाम, वाढलेले वजन व दुष्परिणाम,

# माहेश्वरी महिला मंडळाचे महिलासाठी विविध कार्यक्रम



**माजलगाव । प्रतिनिधी**

जागतिक महिला दिन व फाल्गुन उत्सवा निमित्ताने माहेश्वरी महिला मंडळाच्या वतीने माजलगाव येथे हास्य कवि संमेल, ब्रिज की होली, तथा आनंद नगरीचे कार्यक्रम आयोजित केले होते.या कार्यक्रमास महिलांचा प्रचंड प्रतिसाद होता.हास्य कवी संमेलन या कार्यक्रमात हास्य कविता,हास्य नाटिका व एकांकिका सादर केली होती.

या कार्यक्रमाचा सर्वांनी आनंद घेतला.यात सर्व महिलांनी फुलांची होळी खेळून एक नैसर्गिक रंगाचे आगळावेगळा उदाहरण माजलगावकराना दिले. माजलगावच्या सुना व लेकिन यामध्ये राधाकृष्ण बनवून सर्व महिलांना फुलांच्या रंगांची उधळण केली.राधा ची वेशभूषा या सौ.अंजली कासट तर कृष्णाची वेशभूषा कु.सेजल मुंदडा यांनी केली होती.कार्यक्रमात आनंद नगरीचे पण आयोजन केले होते विविध वस्तूंचे व खाद्यपदार्थाचे स्टॉल लावण्यात आले होते.लहान मुलं महिला व सर्वांनी या कार्यक्रमास भरपूर आनंद घेतला.हा कार्यक्रम माजलगाव येथील राजस्थानी मंगल कार्यालय येथे आयोजित करण्यात आला होता.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माहेश्वारी महिला मंडळांच्या अध्यक्षा सौ.माया चांडक, सचिव सरोज तोष्णीवाल व महीला पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

# संत तुकाराम महाराजांच्या विचारांवर चालणे हीच खरी बीज- दत्ता महाराज दोन्हे पाटील

**बीड । प्रतिनिधी**

संत तुकाराम महाराजांचे विचार हे अभंग रूपाने आजही आपल्यामध्ये जिवंत आहेत. ते आदर्श विचार आपल्या जीवनामध्ये आचरणात आणून आपण आपले आयुष्य सुखी समाधानी व समृद्ध केले पाहिजे हीच खरी बीज असल्याचे प्रतिपादन जगद्गुरु संत तुकोबाराय विचार संस्थापक ह.भ.प. दत्ता महाराज दोन्हे पाटील यांनी केले. बीड शहरापासून जवळच असणाऱ्या तळेगाव येथील जगद्गुरु संत तुकाराम महाराज मंदिर येथील ३७५ व्या बीज सोहळयातील काल्याच्या कीर्तनामध्ये ते बोलत होते. त्यांनी



कीर्तनासाठी अणु रेणू या थोकडा तुका आकाशा एवढा '' हा अभंग घेतला होता. पुढे बोलताना त्यांनी संत तुकाराम महाराज यांनी मानवी जीवनाचे अत्यंत सूक्ष्म पद्धतीने निरीक्षण कसे केले ? हे विविध उदाहरणांच्या माध्यमातून लोकांना समजावून सांगितले. त्याच पद्धतीने तुकाराम महाराज हे आकाशाएवढे कसे हे त्यांनी आकाशाची विविध वैशिष्ट्य सांगून तुकाराम महाराज हे आकाशाएवढे कसे आहेत त्याची व्यापकता समजावून सांगितली. त्यांनी शेतकऱ्यांना केलेले मार्गदर्शन, लोकांना सांगितलेला प्रयत्नवाद, शुद्ध भक्तीचे सांगितलेलं स्वरूप, नीतीमत्तेचं सांगितलेली व्याप्ती, देवाचे केलेले वर्णन याविषयी त्यांनी विस्तृत असे मार्गदर्शन केले.

अंधश्रद्धा, व्यसनाधीनता सोडा- यावेळी संत तुकाराम महाराजांच्या विविध अभंगाचे दाखले देऊन त्यांनी लोकांना अंधश्रद्धेतून व्यसनाधीनतेतून बाहेर पडण्यास सांगितले. संतांनी आपलं शरीर, मन आणि मस्तक शुद्ध करण्याची भक्तीपरंपरा आपण जोपासावी. सध्या लहान मुलापासून मोठ्या माणसापर्यंत प्रत्येक जण मोबाईलच्याही प्रचंड आहारी गेलेला आहे. यातून आपण बाहेर पडूया. हातामध्ये पुस्तक घेऊया. ज्ञानेश्वरी व संतांच्या गाथा हे साहित्य वारकऱ्यांनी प्रमाण मानावे असे त्यांनी सांगितले. संप्रदायामध्ये अनेक भोंदू, बाजारू लोक घुसले आहेत. त्यांच्यापासूनही समाजाने सावध असावे असेही त्यांनी सांगितले. मागील आठ दिवसापासून काकडा, गाथा पारायण, गाथा चिंतन, हरिपाठ, कीर्तन व जागर असे विविध धार्मिक कार्यक्रम भव्य प्रमाणात झाले. कीर्तनासाठी ह.भ.प. परशुराम महाराज मराडे, ह.भ.प. भाऊसाहेब महाराज धांडे, दत्ता महाराज बहिर, श्रीकृष्ण महाराज उबाळे, राजाराम महाराज घोलप, मच्छिंद्र महाराज गोरे, मुंडे महाराज यांच्यासह कीर्तनासाठी तळेगाव, काकडहिरा, बीड, पालवन, च-हाटा तसेच पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कोल्हारवाडी येथे भव्य कुस्ती आखाडा

बीड । प्रतिनिधी

शिवसेना तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांचे गाव असलेल्या कोल्हारवाडी तालुका बीड येथे सालाबादप्रमाणे यंदाही काळुबाबा यात्रेनिमित्त गावकऱ्यांच्या वतीने भव्य कुस्त्यांचा आखाडा भरवण्यात आला होता,या आखाड्यात महाराष्ट्रातील नामवंत पैलवानांनी हजेरी लावल्यामुळे हा कार्यक्रम खूप रंगतदार झाला.विविध ठिकाणाहून आलेल्या जुन्या जाणत्या पैलवानांचा सन्मान करण्यात आला.विशेषतहा महिला पैलवान यांची हजेरी हे विशेष आकर्षक पहायला मिळाले. २० रु.पासुन ते १०,००० रू पर्यन्त कुस्त्या लावण्यात आल्या.या फडाला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर व शिवसेना शिंदे गटाचे युवासेना मराठवाडा विस्तारक बाजीराव दादा चव्हाण यांनी भेट देऊन त्यांच्या वतीने ,५००१ रु .ची कुस्ती लावली.त्यांचा गावकऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.या आखाड्यात जिल्हातून व परजिल्ह्यातील मल्ल मोठ्या संख्येने सामील झाले होते शेवटी आलेल्या सर्व कुस्ती पट्टु व शौकिनांचे गावकऱ्यांच्या वतीने गोरख अण्णा सिंघन यांनी मन:पूर्वक आभार मानले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गावातील सर्व युवक, जेष्ठ मंडळी यांनी एकत्र येऊन परिश्रम घेतले.



This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk



# औरंगजेब समजून जफरशाहाचा फोटो जाळला, पतित पावन संघटनेच्या आंदोलनाचा उडाला फज्जा

**पुणे । प्रतिनिधी**

**औरंगजेबाचे उदात्तीकरण करणाऱ्यांचा निषेधासाठी पुण्यात पतित पावन संघटनेने आंदोलन केले पण या आंदोलनादरम्यानम मोठी चूक झाली.आंदोलकांनी औरंगजेब समजून चक्क मुघल सम्राट बहादूर शाह जफर यांच्या फोटोला चपलांचा हार घातला आणि फोटोही जाळला असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याची आता शहरात चर्चा रंगली आहे. मात्र संघटनेकडून यावर अद्याप कोणतीही प्रतिक्रिया आलेली नाही.**




या घटनेचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत. अनेकांनी संघटनेच्या चुकीवर टीका केली आहे. इतिहासाचा नीट अभ्यास न करता केलेल्या अशा आंदोलनांमुळे संघटनेच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. सोशल मीडियावरील युजर्सनी कार्यकर्त्यांवर संताप व्यक्त केला आहे.

पतित पावन संघटनेच्या कार्यकर्त्यांनी लाल महाल चौकात औरंगजेबविरोधात घोषणाबाजी केली. परकीय आक्रमक आणि क्रूर शासक असलेल्या औरंगजेबाचे उदात्तीकरण करणाऱ्या प्रवृत्तींचा निषेध करण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले. मात्र, आंदोलकांकडून मोठी चूक झाली आणि त्यांनी औरंगजेबऐवजी शेवटचा मुघल सम्राट बहादूर शाह जफर याचा फोटो जाळला.

मुघल सम्राट औरंगजेब याची औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)येथील कबर हटवण्याची मागणी जोर धरू लागली असून, या विषयावर मोठा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. काही हिंदुत्ववादी संघटनांनी औरंगजेबच्या क्रूर कारभाराचा दाखला देत त्याच्या कबरीचे अस्तित्व कायमचे मिटविण्याची मागणी केली. उदयनराजे भोसले यांच्यासह भाजपच्या काही नेत्यांनीही ही कबर उखडून काढण्यासंदर्भात वक्तव्य केले होते. दरम्यान आमदार अबू आझमी यांनी औरंगजेबची महती सांगणारे वक्तव्य केल्यानंतर याविरोधात अनेक संघटना आक्रमक झाल्या असून, त्याला जोरदार विरोध केला जात आहे. औरंगजेब क्रूर शासक होता आणि हिंदू धर्मीयांवर अत्याचार करणारा बादशहा होता, असे मत अनेक हिंदुत्वनिष्ठ संघटनांचे आहे.

### बहादूर शाह जफर कोण होते?

बहादूर शाह जफर हे भारतातील मुघल साम्राज्याचे शेवटचे सम्राट आणि एक प्रसिद्ध उर्दू कवी होते. १८५७ च्या पहिल्या भारतीय स्वातंत्र्ययुद्धात त्यांनी भारतीय सैनिकांचे नेतृत्व केले. युद्धातील पराभवानंतर, ब्रिटिशांनी त्यांना बर्मा (आता म्यानमार) येथे पाठवले जिथे त्यांचे निधन झाले.

# औरंगजेबाच्या कबरीवरून सुप्रिया सुळेंनी मांडली भूमिका, म्हणाल्या, प्रत्येकाच्या आस्थेचा विषय..'

**पुणे । प्रतिनिधी**

गेल्या अनेक दिवसांपासून औरंगजेबाच्या कबरीवरून राज्यातील राजकारण तापले आहे .दुसरीकडे छत्रपती शिवाजी महाराजांसह महापुरुषांच्या अवमानावरूनही मोठा वादंग होताना दिसत आहे .दरम्यान औरंगजेबाची कबर हटवण्याबाबत इतिहासकारांना इतिहासाचा अभ्यास करावा आणि राज्याला रस्ता दाखववावा .खरा इतिहास समोर आला पाहिजे .प्रत्येकाची आस्था वेगळी आहे .सरकारने सर्वांच्या आस्थेचा आदर करावा अशी विनंती करत कबर पाडण्यास खासदार सुप्रिया सुळे यांनी असमर्थन दर्शवलंय . दरम्यान, हटवण्यात योग्य नसल्याची भूमिका रोहित पवारांनी काल घेतली होती .





विधानसभेत औरंगजेबाला उत्तम प्रशासक म्हणत अबू अझमींच्या वक्तव्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात मोठी खळबळ उडाली. यानंतर त्यांनी हे वक्तव्य मागे घेतले मात्र त्यानंतर औरंगजेबाची कबर उखडून टाकावी ही मागणी मोठ्या प्रमाणावर केली जाऊ लागली आहे. या मागणीला विश्व हिंदू परिषदेसह बजरंग दलानेही पाठिंबा दिल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून कबर पाडू नये अशी भूमिका घेतली जात आहे.

जय शिवराय म्हणायला काय प्रॉब्लेम आहे हे राज्याचे छत्रपती आहेत .जय शिवराय मध्ये समतेची भाषा आहे .रयतेचा राज्य आहे .या सगळ्या चांगल्या गोष्टी आहेत हे विचार करून जयंत पाटील यांनी सांगितला आहे .आमच्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज हे देव आहेत .औरंगजेब कबरीबाबत माझे मत असे आहे की ,इतिहासकारांनी इतिहासाचा अभ्यास करावा .आणि राज्याला रस्ता दाखववा .खरा इतिहास आहे तो समोर आला पाहिजे .शिक्षण आरोग्य या सगळ्या विषयात आता सरकारने लक्ष घालावं .प्रत्येकाचे आस्था वेगळी आहे .माझी विनम्र विनंती आहे सरकारने सर्वांच्या आस्थेचा आदर करावा .विरोधक आरोप करत आहेत की लोकशाही आहे .या राज्यात सर्वात जास्त खंडणीखोर कुठल्या पक्षात आहेत हे वेगळे सांगायला नको .असेही सुप्रिया सुळे म्हणाल्या .

# घोटवडे फाट्यावर चक्का जाम; हजारो वाहनांची फजिती, वाहतूक पोलीसांची तारांबळ

पौड : बावधन वाहतूक पोलिसांच्या अनागोंदी कारभाराचा मुळशीतील घोटवडे फाटा येथे लाखो प्रवाशांना फटका बसला. शनिवार-रविवारी घोटवडे फाटा, पिरंगुट, भुगावला अतिशय वर्दळ असते. प्रचंड वाहतूक असूनदेखील येथे वाहतूक पोलीस उपलब्ध नसल्याने ऐन गर्दीत रविवारी संध्याकाळी घोटवडे फाट्यावर चक्का जाम झाला. चारही दिशेला एक ते दीड किलोमीटर वाहनांच्या रांगा लागल्या. अनेक प्रवाशी यामुळे त्रस्त झाले होते.





मुळशी तालुक्यात शनिवार-रविवारी पर्यटकांची प्रचंड गर्दी होत असते. कोकण तसेच मुळशीत हजारो नव्हे तर लाखो पर्यटकही येत असतात. मात्र पर्यटकांना मुळशीतले रस्ते अपुरे पडत असून प्रचंड वाहतूक कोंडी होत असते. स्थानिक नागरिकांना तर यादिवशी घराबाहेर पडणे मुश्किल होते.

अशा परिस्थितीत घोटवडे फाटा, पिरंगुट, भुगाव येथे वाहतूक पोलीस व यंत्रणा उपलब्ध पाहिजे, ते असतील तर हळूहळू का होईना वाहतूक सुरळीत होत असते. मात्र रविवारी संध्याकाळी वाहतूक पोलीस उपलब्ध नसल्याने घोटवडे फाट्याच्या मुख्य चौकात चारही बाजूने वाहने मनमानीपणे आणली गेली. त्यामुळे प्रचंड वाहतूक खोळंबा झाला.

या प्रचंड वाहतूक खोळंब्यात बावधन पोलीस चौकीचे २ पोलीस आणि काही सुज्ञ नागरिक वाहतूक सुरळीत करत होते. मात्र वाहतूक पोलीस उपलब्ध नव्हते. या वाहतूक खोळंब्यात लहान मुलं, ज्येष्ठ नागरिक व महिलांचे प्रचंड हाल झाले. अनेक नागरिकांनी पायी चालत जाणे पसंत केले. तर बस वाहतुकीत खोळंबल्याने बसने जाणाऱ्या अनेक प्रवाशांना बसची वाट पाहत बसावी लागल्याने दैना झाली.घोटवडे फाटा, पिरंगुट, भुकूम, भुगाव हे परिसर नुकतेच पौड पोलिसांच्या कार्यक्षेत्राच्या अखत्यारित्यातून काढून बावधन पोलिसांच्या कार्यकक्षेत पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या अखत्यारित्यात राज्य शासनाने दिले आहे. मात्र यानंतरच या परिसरातील वाहतुकीला मोठा फटका बसू लागला आहे. त्यामुळे परिसरातील नागरिक काकुळतीला आले असून बावधन पोलिसांच्या कार्यकक्षेतून ते पुन्हा पौड पोलिसांच्या अखत्यारित्यात देण्यात यावे, अशी मागणी नागरिक करत आहेत.

# थेऊर येथील महिला मारहाण मृत्यू प्रकरणात जैद टोळीवर मोक्का कारवाई

उरुळी कांचन : लोणी काळभोर परिसरासह विविध पोलिस ठाण्यांच्या हद्दीत खून, खुनाचा प्रयत्न, बलात्कार, फसवणूक, धरधाव वेगाने गाड्या चालवून अपघात करणे, बेकायदेशीररीत्या हत्यारे बाळगून दहशत निर्माण करणे, अशा स्वरूपाचे गंभीर गुन्हे दाखल असलेल्या भरत तुकाराम जैद टोळीवर मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.




टोळी प्रमुख भरत तुकाराम जैद व त्याचे इतर सहा ते सात साथीदार यांच्यावर चाकण, आळंदी, भोसरी, एम आय डी सी, निगडी, दिघी, पिंपरी आदी पोलिस स्टेशनमध्ये खून, खुनाचा प्रयत्न, बलात्कार, फसवणूक, धरधाव वेगाने गाड्या चालवून अपघात करून निष्पाप लोकांचे जीव घेणे, बेकायदेशीररीत्या हत्यारे बाळगून दहशत निर्माण करणे, अशा स्वरूपाचे गंभीर गुन्हे दाखल आहेत.

लोणी काळभोर पोलिस स्टेशनच्या हद्दीतील थेऊर येथील अक्षय चव्हाण व त्याची पत्नी शीतल चव्हाण यांच्यावर जैद टोळीने लघुशंका करताना हटकले म्हणून मारहाण केली होती. यावेळी चव्हाण यांच्यावर दगडफेक करून गोळीबार केला होता. यात शीतल चव्हाण यांच्या डोक्यात दगड लागून त्या गंभीर जखमी झाल्या होत्या. त्यांना खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी जैद टोळीवर लोणी काळभोर पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.

दरम्यान, जैद टोळीचे आजवरचे कारनामे लक्षात घेवून टोळीप्रमुख भरत जैद व त्याच्या इतर सात साथीदार महाराष्ट्र राज्य संघटित गुन्हेगारी कायद्यांतर्गत (मोक्का) कारवाई करण्याचा प्रस्ताव लोणी काळभोर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांनी परिमंडळ ०५ चे पोलिस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे यांच्या मार्फत पोलिस आयुक्तांना सादर केला होता. यानुसार जैद टोळीवर मोक्का कायद्यांतर्गत कारवाई करण्यात आली आहे.ही कारवाई पोलिस आयुक्त अमितेश कुमार, अपर पोलिस आयुक्त मनोज पाटील, पोलीस उप आयुक्त डॉ. राजकुमार शिंदे, सहाय्यक पोलिस आयुक्त अनुराधा उदमले यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे, पोलिस उपनिरीक्षक उदय काळभोर, पोलिस हवालदार तेज भोसले, संभाजी देवीकर, प्रशांत नरसाळे, मंगेश नानापुरे, संदीप धुमाळ, महिला पोलिस योगिता भोसुरे यांनी केली आहे.

# पुण्यात एकाच रात्रीत तीन अपघात, २ जणांचा मृत्यू तर ३ जण जखमी

पुणे । प्रतिनिधी

पुण्यात एकाच रात्रीत तीन अपघात झाले आहेत. एकाच रात्री झालेल्या वेगवेगळ्या तीन अपघातात २ जणांचे मृत्यू तर ३ जण जखमी झाले आहेत. पुण्यातील काळेपडळ पोलीस स्टेशन आणि फुरसुंगी पोलीस स्टेशनच्या हद्दीत हे तिनही अपघात घडले आहेत. यामुळं पुन्हा एकदा पुण्यातील अपघातांचा मुद्दा ऐरणीवर आला आहे.




पहिल्या अपघातात ३४ वर्षीय डिलिव्हरी बॉयचा तर दुसऱ्या एका अपघातात ८५ वर्षीय वृद्ध महिलेचा मृत्यू झाला आहे. पहिला अपघात पुणे सासवड रोडवर उरळी देवाची या परिसरात घडला असून, या अपघातात सिंधुबाई क्षीरसागर या वृद्ध महिलेचा जागीच मृत्यू झाला आहे. तर चारचाकी वाहन पाठीमागे घेत असताना वाहनाची महिलेला जोरदार धडक दिली. या धडकेत महिलेचा मृत्यू झाला आहे. या प्रकरणातील चालक मनोज अहिरेला पोलिसांनी अटक केली आहे. तर दुसऱ्या अपघातात काळेपडळ परिसरातील फूड डिल्व्हरी बॉयला अज्ञात चारचाकी वाहनाने धडक दिल्याने डिलिव्हरी बॉयचा जागीच मृत्यू झाला आहे. मझहर जिलानी शेख असे मृत्यू झालेल्या तरुणाचं नाव आहे. याप्रकरणी अज्ञात चालकाविरुद्ध पुण्यातील काळेपडळ पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांकडून अज्ञात वाहन चालकाचा तपास सुरु आहे. तर तिसरा अपघात हा हडपसर परिसरात झाला. जेएसपीएम कॉलेजच्या समोर एक भीषण अपघात झाला असून, या अपघातात देखील एक तरुण गंभीर जखमी झाल्याची माहिती पोलिसांकडून मिळत आहे.

# न. प. शाळेतील मुलींच्या उपस्थितीसाठी विशेष तरतूद; मुख्याधिकारी गजानन शिंदे यांची माहिती

**भोर । प्रतिनिधी**

भोर नगरपरिषदेच्या सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पाला प्रशासकीय सभेत मान्यता देण्यात आली. या अर्थसंकल्पात कोणतीही करवाढ करण्यात आलेली नाही, तसेच या शिल्लकीच्या अर्थसंकल्पातून शहरातील १० वीच्या ५० विद्यार्थिनींसाठी एमएस- सीआयटी प्रशिक्षण देण्याची योजना सुरू करण्यात येणार आहे. भोर नगरपरिषद शाळांमध्ये मुलींची उपस्थिती वाढविण्यासाठी ५ रुपये प्रति विशेष उपस्थिती भत्त्याची तरतूद करण्यात आल्याची माहिती मुख्याधिकारी गजानन शिंदे यांनी दिली.




विकासाच्या दृष्टीने व जनतेच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष न करता मार्गदर्शक तत्त्वानुसार प्रशासनाने हे अंदाजपत्रक बनविले आहे. यात नगरपरिषदेची आर्थिक बाजू सक्षम राहण्यासाठी करवसुली तसेच पाणी, भुयारी गटार योजना आणि शहरातील रस्ते मजबुतीकरणाला प्राधान्य देण्यात आले. यात मर्यादित उत्पन्न व खर्चाचा समन्वय साधाण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. नको असलेल्या खर्चाला काटछाट देण्यात आली आहे. महिला व बालकल्याण विभाग दुर्बल घटकातील नागरिक, दिव्यांग नागरिकांसाठी प्रत्येकी ५ टक्के तरतूद करण्यात आली.

# शिवनेरी किल्ल्यावर आग्या मोहोळ मधमाशांचा हल्ला; ३० ते ४० पर्यटक जखमी

जुन्नर: छत्रपती श्री शिवाजी महाराज यांचे जन्मस्थळ किल्ले शिवनेरी येथे हजारो शिवभक्त तसेंच पर्यटक भेट देत असतात. आज रविवार सुटीचा दिवस असल्याने अनेक शिवभक्त तसेच पर्यटक शिवजन्मस्थळाचे दर्शन घेण्यासाठी गडावर उपस्थित होते.

अशातच शिवनेरी किल्ल्यावर पर्यटकांवर मधमाशांच्या हल्ला झाल्याची माहिती समोर आली आहे. या हल्ल्यात ३० ते ४० जण जखमी झाल्याची माहिती आहे. त्यांच्यावर ग्रामीण रुग्णालय जुन्नर येथे प्राथमिक उपचार करण्यात आले.

त्यामुळे शिवनेरी किल्ल्यावर दुर्गप्रेमींची धावपळ पहायला मिळत आहे. ही घटना सकाळी सव्वा नऊ च्या दरम्यान घडली असल्याचे सांगितले जात आहे. यावेळी गडावर उपस्थित असलेले खासदार निलेश लंके यांनी ही मदतकार्यास सहभाग घेतला.

शिवाई देवी मंदिर व शिवजन्मस्थळाचे जवळ ही घटना घडल्याने सर्व शिवभक्त व पर्यटकांना रेसक्यू टीम व वनविभागाच्या वतीने सुखरूप गडावरून खाली उतरवण्यात आले. आरोग्य विभागाच्या सहा ते सात म्बुलन्स शिवनेरी किल्ल्याच्या पायथ्याशी दाखल झाल्या आहेत. तर काही विद्यार्थी गडावर अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे. वनविभागाचे आगी मोहोळ शांत करण्याचे शर्तीचे प्रयत्न सुरू आहेत.



ऐन उन्हाळ्यात अशा घटना वारंवार घडत असून १९ फेब्रुवारी रोजी शिवजयंती उत्सवादरम्यान मराठा सेवा संघाच्या वतीने आयोजित अभिवादन सभा संपल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार व एकनाथ शिंदे यांच्या हेलिकॉप्टरने प्रस्थान केल्यानंतर थोड्याच वेळाने आग्या मोहोळाच्या मधमाशा चावल्याने अनेक शिवभक्त जखमी झाले होते.

# 'विघ्नहर' कारखान्यावर पुन्हा सत्यशील शेरकर यांचीच सत्ता

नारायणगाव: जुन्नर तालुक्यातील श्री विघ्नहर सहकारी साखर कारखान्याच्या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये सत्यशील शेरकर यांच्या शिवनेर पॅनेलने सर्वच जागांवर विजय मिळवून कारखान्यावरील आपले वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. संचालकांच्या २१ जागांपैकी तब्बल १७ जागा बिनविरोध झाल्यानंतर उर्वरित चार जागांवर देखील प्रचंड मताच्या फरकाने सत्यशील शेरकर यांचे उमेदवार विजयी झाले.




विघ्नहरच्या चार जागांसाठी झालेल्या निवडणुकीच्या मतमोजणीला रविवारी (दि. १६) सकाळी ९ वाजता सुरुवात झाली. साडेअकरा वाजता सर्व निकाल हाती आले. पहिला निकाल ओबीसी गटाचा लागला. यामध्ये शिवनेर पॅनेलचे सुरेश भिमाजी गडगे ९ हजार ९२० मतांनी विजयी झाले, तर त्यांचे प्रतिस्पर्धी उमेदवार रहेमान इनामदार यांना अवघी ११६ मते मिळाली. या गटातील दुसरे उमेदवार निलेश भुजबळ यांना २२१ मते मिळाली.

शिरोली गटामध्ये सत्यशील शेरकर यांना १० हजार ६१७ पैकी १० हजार ४२३ सर्वाधिक मते मिळाली. या गटातील सुधीर खोकराळे यांना १० हजार ५७ मते मिळाली, तर संतोष खैरे यांना १० हजार २५मते मिळाली, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी गोविंद शिंदे यांनी दिली. एकूण मतदानापैकी ९९७ मते अवैध ठरली. कारखान्याचे एकूण सभासद १९ हजार ६२७असून यापैकी १० हजार ६१७ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.


दरम्यान विघ्नहर कारखान्याचा निवडणूक कार्यक्रम १० फेब्रुवारी रोजी जारी करण्यात आला होता. यामध्ये एकूण ६६ अर्ज दाखल झाले होते. छाननीमध्ये ४ अर्ज बाद झाले होते. शिल्लक ६२ पैकी ३७जणांनी माघार घेतली होती. जुन्नर गटामधून अशोक घोलप, देवेंद्र खिलारी व अविनाश पुंडे हे तिघे बिनविरोध निवडून आले. ओतूर गटामधून धनंजय डुंबरे, बाळासाहेब घुले, रामदास वेठेकर व पंकज वामन हे चौघेजण बिनविरोध निवडून आले आहेत.

पिंपळवंडी गटामधून विवेक काकडे, प्रकाश जाधव व विलास दांगट हे तिघे बिनविरोध निवडून आले आहेत. घोडेगाव गटामधून यशराज काळे, नामदेव थोरात व दत्तात्रय थोरात हे तिघे बिनविरोध निवडून आले आहेत. महिला गटामधून नीलम तांबे व पल्लवी डोके या बिनविरोध निवडून आल्या आहेत. अनुसूचित जाती/जमाती गटामधून प्रकाश सरोदे तसेच विमुक्त जाती/जमाती या गटामधून संजय खेडकर हे बिनविरोध निवडून आले आहेत.दरम्यान विघ्नहर कारखान्याची निवडणूक बिनविरोध होण्यासाठी आमदार शरद सोनवणे, भाजप नेत्या आशाताई बुचके, माजी आमदार अतुल बेनके, जुन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती संजयराव काळे यांनी मदत केली.

# घरगुती वादातून स्वत:च्याच झोपडीची राखरांगोळी

**शिरूर । प्रतिनिधी**

घरगुती व प्रापंचिक कारणावरून रागाच्या भरात पतीने स्वतःची झोपडी पेटवून दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. हा प्रकार शुक्रवारी (दि. १४) रात्री टाकळी हाजी (ता. शिरूर) येथे घडला आहे. या घटनेने परिसरातून हळहळ व्यक्त केली जात आहे. याबाबत उषा संतोष पवार (वय-२७) यांनी शिरूर पोलिस ठाण्यात पती संतोष वसंत पवार याच्या विरुद्ध तक्रार दाखल केली आहे.



मूळचे अहिल्यानगर जिल्ह्यातील बोटा येथील रहिवासी असलेले पवार कुटुंब उदरनिर्वाहासाठी टाकळी हाजी येथील शिनगरवाडी जवळ राहत आहे. भूमिहीन असल्याने परिस्थितीवर मात करण्यासाठी मोलमजुरीचे काम करून पत्नी संसाराचा गाडा हाकत आहे. दरम्यान, सायंकाळी जेवण करत असताना उषा हिने माझ्या सोबत मजुरीच्या कामाला चला असे म्हटल्याचा राग पती संतोषला आल्याने त्याने स्वतःचीच झोपडी पेटवून दिली.

झोपडी पेटल्यानंतर शेजाऱ्यांनी आग विझविण्याचा प्रयत्न केला. मात्र, आग आटोक्यात आली नाही. शेतकऱ्यांनी याबाबत माजी सरपंच दामूशेठ घोडे यांना कळविताच ते तात्काळ पोलिसांसह घटनास्थळी दाखल झाले. मात्र पोलिस आल्याची चाहुल लागताच संतोष तेथून पसार झाला. पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक दिपक कारंडे करीत आहेत.

पतीला दारूचे व्यसन असल्याने वारंवार त्रास देत आहे. आज ना उद्या सुधारेल या आशेवर आजवर आवाज उठविला नाही. स्वतःच्या कष्टाने मुलीचे लग्न केले असून मुलगा आश्रमशाळेत शिकत आहे. दररोज मीच कामाला जायचे, संतोष हा मात्र फक्त दारु पिऊन घरी गोंधळ घालत असतो. घरातील सर्व साहित्य जळून खाक झाले असून मला जीवे मारण्याची धमकी दिल्याने पोलिसांत तक्रार द्यावी लागली, असे उषा पवार यांनी सांगितले आहे.

cmyk